DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

thanevaibhav Thane Vaibhav | Thane Vaibhav | thanevaibhav

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

आतील पानात

टोविंग व्हॅन कर्मचारी वाहनधारकावर गेला धावून

महादेव जानकर महायुतीतून बाहेर, स्वबळावर लढणार!

घनकचरा प्रकल्पाची नेदरलँडच्या शिष्टमंडळाकडून पाहणी

इच्छुकांची व्यथा

➤अग्रलेख /५

www.thanevaibhav.in/mr

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक । इष्ट ते छापणार । संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

भारतीय सौर दिनांक अश्विन २५ शके १९४५ । वर्ष ५० । अंक ५१ । गुरुवार १७ ऑक्टोबर २०२४ । पाने ६ । रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

ख | ट्या | ळ | की



### तिकीट

भेट नेत्याची मिळाली तर
ती समजावी चंद्रावर स्वारी
मिळता तिकीट निवडणुकीचे
ती समजावी कोजागिरी !

@मिलिन्द

## ठाणे जिल्ह्यातील ७१,५५,७२८ मतदार करणार विनासायास मतदान

# मतदान केंद्रे वाढवली; मतदारक्षमता घटवली!

**ठाणे : ठाणे जिल्ह्यातील मतदान केंद्रांची संख्या यंदा 350ने वाढवली असून केंद्रनिहाय मतदारांची संख्याही कमी केली आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील 71 लाख 55,728 मतदारांना मागील निवडणुकीप्रमाणे यंदा कोणताही मनस्ताप होणार नाही, असा विश्वास जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी व्यक्त केला आहे.**



**सर्वाधिक मतदार ओवळा-माजिवडा मतदारसंघात असून त्याची संख्या पाच लाख 40,293 इतकी आहे तर सर्वाधिक कमी मतदार दोन लाख 80,852 उल्हासनगर येथे आहेत. या निवडणुकीकरिता 6,894 मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. त्याकरिता 35 हजार कर्मचारी लागणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. शिनगारे म्हणाले.**

जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आगामी विधानसभा निवडणूक 20 नोव्हेंबर रोजी होणार आहे. जिल्ह्यातील 18 विधानसभा मतदारसंघांत जिल्हा निवडणूक अधिकारी आणि कर्मचारी काय उपाययोजना करणार आहेत, याची माहिती देण्यासाठी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी मतदान केंद्राची संख्या 6553 वरुन 6,894 इतकी केली असल्याचे ➤पान ३ वर

## आगरी-कोळी भवन; नजीब मुल्ला यांचे वचन



**कळवा-मुंब्रा मतदारसंघ, त्याचबरोबर ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आगरी-कोळी भूमिपुत्र राहतात. त्यांच्याकरिता कळवा येथे आगरी कोळी भवन उभारण्यात येणार आहे. त्यासाठी 40 कोटी निधीमधील पाच कोटींचा निधी पहिल्या टप्प्यात वापरला जाणार असल्याचे श्री. मुल्ला यांनी सांगितले. या मतदार संघातील शाळांची डागडुजी करण्याबरोबर गरीब विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी देखील महायुती सरकारने निधी दिला असल्याचे श्री. मुल्ला म्हणाले.**

**ठाणे :** मुंब्रा-कळवा विधानसभा मतदारसंघात आमदार जितेंद्र आव्हाड यांनी वारकरी भवन उभारण्याची घोषणा केली असतानाच या मतदारसंघातील राष्ट्रवादीचे संभाव्य उमेदवार नजीब मुल्ला यांनी आगरी-कोळी भवनाचे गिफ्ट मतदारांना देणार असल्याचे जाहीर करून निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. महायुतीचे राज्यातील उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी तातडीने मुंब्रा-कळवा विधानसभा मतदारसंघातील विकासासाठी नियोजन विभागामार्फत 40 कोटींचा विकास निधी मंजूर केला असल्याची माहिती ठाणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आनंद परांजपे आणि ज्येष्ठ नगरसेवक नजीब मुल्ला यांनी पत्रकार परिषदेत दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांनी मुंब्रा-कळवा भागाचा नागरी विकास करण्यासाठी हा निधी दिला आहे तसेच अल्पसंख्याक विभागाचे मंत्री अब्दुल सत्तार यांनी देखील पाच कोटींचा निधी दिला आहे. यापूर्वी स्थानिक ➤पान ३ वर

## थोडक्यात

### भावजयीने दिले दिराला जीवनदान

**शहापूर :** सध्याच्या युगात विभक्त कुटुंब पद्धतीमुळे नात्याची माणसे दुरावत चालली आहेत. असे असूनही शहापूर तालुक्यातील एका नवदुर्गेने आपल्या दिराला यकृत देऊन त्यांना जीवनदान दिले आहे. ही घटना लेनाड (गोकुळगाव ) येथील आहे.

ही घटना ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील लेनाड (गोकुळगाव) येथील आहे. संबंधित रुग्णाला यकृताची समस्या सुरु झाली तेव्हापासून त्यांच्यावर मुंबईतील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. रुग्णाचे वय 40 असल्याने तसेच प्रपंचाचा गाडाही पाठीशी असल्याने यकृत प्रत्यारोपणाशिवाय कोणताही मार्ग नव्हता. यकृत बदलल्याशिवाय समस्या सुटणार नाही, असे सांगितल्यावर यकृत दान करणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरु झाला. यकृताच्या चाचण्याही यावेळी घेण्यात ➤पान ३ वर

### तरुणाला ठेवले मालदीवमध्ये डांबून

**भाईंदर :** भाईंदर पूर्वेच्या ऑरेंज हॉस्पिटल परिसरात राहणाऱ्या पारीख कुटुंबियांचा मुलगा काही महिन्यांपूर्वी मालदीव येथे शेफच्या कामासाठी गेला होता. मात्र काही दिवसांपासून त्यांच्या मुलाला तिकडे त्रास देण्यास सुरुवात झाली. आपल्या मुलाला मालदीवहून भारतात परत येण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावे यासाठी गायत्री पारेख यांनी प्रसिद्धी माध्यमातून मागणी केली आहे.



हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेऊन अधिक वेतनाच्या आशेने मालदीव येथे खाजगी एजन्सीद्वारे गेलेल्या पारेख कुटुंबातील मुलास शेफच्या कामाऐवजी मोलमजुरी करावयास लागत असल्याने तो घरी ➤पान ३ वर

### डहाणू विधानसभेसाठी पुन्हा विनोद निकोले

**मुंबई :** महाविकास आघाडीत असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीची राज्य आणि जिल्हा कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत एकमताने ठराव मंजूर करण्यात आला असून सध्याचे डहाणू मतदारसंघाचे विद्यमान आमदार विनोद निकोले हेच पुन्हा सीपीएम पार्टीचे डहाणू विधानसभेचे उमेदवार असणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

विनोद निकोले यांच्या नावाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या राज्य आणि जिल्हा कार्यकारणी कमिटीच्या बैठकीत एक मताने मंजुरी देण्यात आली असून महाविकास आघाडीने देखील त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली आहे.

1978 पासून झालेल्या गेल्या 10 विधानसभा निवडणुकांपैकी तब्बल 9 वेळा ही जागा माकपने जिंकली आहे. संपूर्ण तलासरी तालुका आणि डहाणू तालुक्याचा मोठा भाग या ➤पान ३ वर

## टीएमटीच्या १६० वातानुकूलित बसगाड्या टेंडरमध्ये अडकल्या

### फेरनिविदा काढल्याने करावी लागणार प्रतिक्षा

**ठाणे :** ठाणे परिवहन सेवेत दाखल होणाऱ्या 160 वातानुकूलित बसेस टेंडरमध्ये अडकल्या आहेत. ठेकेदाराच्या आडमुठ्या भूमिकेमुळे प्रशासनाला फेरनिविदा काढावी लागल्याने काही महिने तरी ठाणेकरांना वातानुकूलित बसेसचे वाट पहावी लागणार आहे.



ठाणे परिवहन सेवेचा 2024-25 चा 694 कोटी 56 लाखांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. परिवहन ताफ्यात पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून शून्य उत्सर्जन-प्रदूषण विरहित इलेक्ट्रीक बससह वातानुकुलीत ई बसचा समावेश करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली होती. त्यानुसार ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात 123 ईलेक्ट्रीक बस दाखल झाल्याने सद्यस्थितीत टीएमटीच्या 446 बस प्रवाशांना सेवा देत आहेत. यात वित्त आयोगाच्या निधीतून ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट (जीसीसी) तत्वावर वातानुकुलित ईलेक्ट्रीक नऊ मीटरच्या 100 बस आणि 12 मीटरच्या 60 बसची खरेदी करण्यात येणार आहे. या 160 वातानुकुलित ई बसच्या खरेदी, संचलन (चालकासह) आणि देखभालीसाठी टीएमटी प्रशासनाने निविदा प्रक्रिया राबवली होती. मात्र, ठेकेदारांनी जादा दराची अपेक्षा ठेवल्याने परिवहन व्यवस्थापनाने हे प्रस्ताव धुडकावले असून 160 ई बससाठी फेरनिविदा काढली आहे.

ठाण्यात नागरीकरण वाढल्याने दिवसेदिवस वाढत असलेला प्रवासी संख्या लक्षात घेऊन टीएमटीच्या ताफ्यात इलेक्ट्रिक वातानुकुलीत 10 डबल डेकर बस दाखल करण्याचे ठरले होते. मात्र, टीएमटी प्रशासनाने याबाबत अद्याप काहीच हालचाली ➤पान ३ वर

## कडोंमपा कर्मचाऱ्यांना १९,५०० रुपये बोनस

**कल्याण :** महायुती सरकारने कल्याण-डोंबिवली महापालिकेतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळीला प्रत्येकी 19,500 रुपयांचा बोनस देण्याचा निर्णय काल सकाळी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या सन 2024-25च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये सन 2023-24 या आर्थिक वर्षासाठी महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान देण्यासाठी 963.61 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून याच रकमेतून हे सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेतील सर्व कायम अधिकारी/ ➤पान ३ वर

## महायुतीने रिपोर्ट मांडला; विरोधकांवर निशाणा साधला

**मुंबई :** निवडणुकांची घोषणा होताच राजकीय घडामोडींना वेग आला असून आज महायुतीची महत्वाची पत्रकार परिषद पार पडली. यावेळी महायुतीच्या दोन वर्षांच्या कामगिरीचे रिपोर्ट कार्ड सादर करण्यात आले. रिपोर्ट कार्ड सादर करतांना महायुतीच्या नेत्यांनी विरोधकांवर निशाणाही साधला.

महायुती सरकारने सादर केलेल्या रिपोर्ट कार्डमध्ये "लाडकी बहीण योजना, टोलमाफी, महिला, युवक, कामगार यांच्यासाठी आणलेल्या कल्याणकारी योजना राबवून महायुतीने सर्वसामान्य जनतेसाठी काय केले, याची माहिती आहे. मागील दोन ते अडीच वर्षांमध्ये सरकारने कुठे गुंतवणूक केली याचीही माहिती या रिपोर्ट कार्डमध्ये आहे. यावेळी ➤पान ३ वर



**अजित पवार म्हणाले की, "जनतेच्या जीवन बदलणाऱ्या योजना आम्ही दिल्या आहेत. आमच्या योजनांचा मिळणारा प्रतिसाद पाहून विरोधक गडबडले आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या यशामुळे ते गडबडून गेले आहेत. ज्यावेळी आम्ही लाडकी बहीण योजनेची घोषणा केली तेव्हा या योजनेची अंमलबजावणी होणार नाही, फॉर्म भरले जातील पैसे मिळणार नाहीत अशी टीका विरोधकांनी केली. मात्र अडीच कोटी महिलांच्या खात्यामध्ये गेल्या पाच महिन्यांपासून पैसे जमा होत असल्याचे त्यांनी सांगितले.**

## वर्षानुवर्षे एकाच विभागात कार्यरत ५४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या



### पदोन्नती झाल्याने काहींची दिवाळी गोड

**उल्हासनगर :** सामान्य प्रशासनाच्या अहवालानुसार आयुक्त विकास ढाकणे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत 54 कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. तर काहींची पदोन्नती करण्यात आल्याने त्यांची दिवाळी गोड झाली आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील काही कर्मचारी वर्षानुवर्ष एकाच विभागात कार्यरत होते. एकाच पदावर अनेक वर्षे काम करीत असल्याने त्यांच्या मनमानी कारभाराबाबत सतत तक्रारी वाढत होत्या. ही बाब लक्षात घेऊन मनपा आयुक्त विकास ढाकणे यांनी मंगळवारी जवळपास 54 कर्मचाऱ्यांची दुसऱ्या विभागात उचलबांगडी केल्याने प्रथमच पालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे. यामध्ये कनिष्ठ लेखा परीक्षक, वरिष्ठ लिपिक, कर निरीक्षक, कनिष्ठ लिपिक, जकात निरीक्षक, शिपाई, सुरक्षा रक्षक, सफाई कामगार, मजूर यांचा समावेश आहे.

आयुक्त विकास ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त जमिर लेंगरेकर, उपायुक्त डॉ.विजय खेडकर आणि सहायक आयुक्त सुनिल लोंढे यांनी कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावली आहे.

एकीकडे एकाच विभागात वर्षोनुवर्षे कार्यरत कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली असताना दुसरीकडे आयुक्त विकास ढाकणे ➤पान ३ वर

## परशुराम आर्थिक विकास महामंडळ अध्यक्षपदी आशिष दामले

**बदलापूर :** राज्यपाल पी. सी. सुब्रमण्यम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आशिष दामले यांची नव्याने परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.



महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल राज्यपाल तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे आशिष दामले यांनी आभार मानले आहेत. ब्राम्हण समाजाच्या विकासासाठी आशिष दामले योगदान देतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष आणि खासदार तटकरे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी उपनगराध्यक्ष आणि पक्षाचे शहराध्यक्ष असताना बदलापूरमध्ये आशिष दामले यांनी विविध नागरी हिताचे उपक्रम राबवून पक्ष संघटना मजबूत केली आहे. विद्यार्थी, महिलांसाठी विविध कार्यक्रम, राबवण्यावर प्रामुख्याने भर दिला. परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवल्यानंतर महामंडळाचे काम कार्यक्षमतेने सर्वोत्तम करणार असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष दामले म्हणाले.

### ४४१ मतदान केंद्रांवर पार पडणार मतदान प्रक्रिया

## कल्याण पश्चिमेत ४,३४,९२८ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**कल्याण :** कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघ निवडणूकीची मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली असून त्यानुसार आजमितीस मतदारांची संख्या चार लाख 34,928 इतकी आहे. यापैकी पुरुष मतदार दोन लाख 28,788 व स्त्री मतदार दोन लाख 6,125 व इतर मतदार 15 इतके आहेत.

कल्याण पश्चिम विधानसभा संघामध्ये 137 लोकेशनवर एकूण 441 मतदान केंद्रे असून आहेत. तसेच चार सहायकारी मतदान केंद्राचा प्रस्ताव मंजुरीकरीता जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आला असल्याची माहिती कल्याण पश्चिम विधानसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी तहसीलदार सचिन शेजाळ उपस्थित होते.



कल्याण पश्चिम विधानसभा मतदार निवडणूकीच्या संपूर्ण कालावधीमध्ये आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे आणि आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी 8-8 तसांच्या 3 सत्रामध्ये अहोरात्र (24x7) सनियंत्रण ठेवणेकरिता 9 फ्लाईंग स्क्वॉड, 9 स्टॅटीक सर्वेलन्स टीम, 6 व्हिडीओ निरीक्षण पथके तयार करणत आलेली आहेत.

मतदानाचे साहित्य वाटप व मतदान झाल्यानंतर ➤पान ३ वर






पान १ वरुन

## मतदान केंद्रे वाढवली; मतदारक्षमता घटवली!

सांगितले. लोकसभा निवडणुकीत एका मतदान केंद्रावर किमान 1600 मतदारांची नावे होती, ती संख्या बाराशे इतकी करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी श्री. शिनगारे म्हणाले. लोकसभा निवडणुकीत मतदारांना उन्हाचा त्रास झाला होता तसेच बसण्याची सोय नव्हती, परंतु यावेळी सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले.

ठाणे जिल्ह्यात 18 विधानसभा मतदारसंघ असून 71 लाख 55,728 मतदार आहेत. त्यामध्ये 38 लाख 13,264 पुरुष तर 33 लाख 41,070 स्त्री मतदार आहेत. नवीन मतदारांची संख्या 16 लाख 5597 इतकी असून दिव्यांग मतदार 37,854 इतके आहेत. 85 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांची संख्या 57,209 एवढी असल्याचे श्री. शिनगारे म्हणाले.

## भावजयीने दिले दिराला जीवनदान

आल्या. यासाठी अनेकांचा रक्तगट तपासला, त्यात भावजयीचा रक्तगट जुळून आला. या आधुनिक दुर्गाने कोणताही विचार न करता आपल्या दिराला जीवदान देण्याचे ठरविले. या नवदुर्गेच्या आत्मविश्वासाच्या बळावर डॉक्टरांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली.

सध्या रुग्णाची तब्बेत चांगली असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सध्याच्या युगात विभक्त कुटुंब पद्धतीमुळे नात्याची माणसे दुरावत चालली असताना नवदुर्गा भावजयीने दिराला पुनर्जन्म दिल्याने तालुक्यातून कौतूक होत आहे. या घटनेमुळे अवयव दान चळवळीसदेखील प्रेरणा मिळण्यास मदत होईल असे बोलले जात आहे. ही शस्त्रक्रिया करणारे डॉ.गुरुप्रसाद शेट्टी, डॉ.रोहन चौधरी आणि डॉ.अमेय सोनावणे यांसह परिचारिका व तंत्रज्ञ यांचे रुग्णाच्या कुटुंबियांकडून आभार मानले जात आहेत.

## आगरी-कोळी भवन; नजीब मुल्ला यांचे वचन

स्थानिक खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी 55 कोटींचा विकास निधी दिलेला आहे. नजीब मुल्ला यांच्या प्रयत्नाने नियोजन विभागामार्फत 21 जून 2024 रोजी 50 कोटीचा निधी आला होता तर अल्पसंख्यांक विभागामार्फत 3 ऑक्टोबर 2024 रोजी पाच कोटींचा निधी, या भागातील रस्ते जलमय होतात, त्यातून सुटका व्हावी यासाठी 31 कोटी आणि आता नियोजन विभागामार्फत 14 ऑक्टोबर रोजी 40 कोटी असा एकूण 181 कोटींचा विकास निधी मुंब्रा-कळवा विधानसभा क्षेत्रातील विकासासाठी महायुती सरकारकडून देण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश प्रवक्ते, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी दिली.

दोन दिवसांपूर्वी आ.आव्हाड यांनी कळवा येथिल खारभूमी कार्यालयाजवळ वारकरी भवन उभारणार असल्याचे जाहीर केले होते. त्याला श्री.मुल्ला यांनी आगरी कोळी भवनाने प्रत्युत्तर दिल्याचे बोलले जात आहे. एकूणच या मतदारसंघात गुरु-शिष्याची लढत रंगतदार होणार असल्याचे बोलले जात आहे.

## तरुणाला ठेवले मालदीवमध्ये डांबून

परत येण्यासाठी प्रयत्न करीत आहे. मात्र त्याला घरी पाठविण्याऐवजी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्याने भारतात परत येण्याचा प्रयत्न केला असता त्यास विरोध करण्यात आला असून इकडे येण्यापासून रोखले जात आहे. त्याच्यासोबत 10 ते 15 जण अडकले असून त्या सर्वांनी पारीख यांच्या आईकडे विंनती केली आहे.

त्यानंतर गायत्री पारीख यांनी मंत्रालय, राजकारणी, स्थानिक पोलीस यासह सर्व ठिकाणी पत्रव्यवहार केला असून अनेक चकरा मारल्या. मात्र त्यांना यश मिळाले नाही. अनेक प्रयत्न करून देखील हाती अपयश आल्यावर त्यांनी अखेर प्रसिद्धी माध्यमांकडे मदत मागितली व त्यांच्या मुलाला मुंबईत आणण्यासाठी मदत मिळावी या करीता भारतीय प्रशासनाने मदत करावी अशी विंनती केली आहे.

परदेशातील भारतीय राजदूत कार्यालयामार्फत मालदीवमध्ये अडकलेल्या पारेख कुटुंबातील मुलासह इतरांची सुटका करून त्यांना भारतात परत आणण्याची विनंती गायत्री पारेख यांनी केली आहे.

## टीएमटीच्या १६० वातानुकूलित बसगाड्या टेंडरमध्ये अडकल्या

किंबहुना, डबल डेकर बसेस वगळून केवळ 160 ई वातानुकुलित बससाठीच निविदा प्रक्रिया राबवली असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दरम्यान डबल डेकरचा प्रस्ताव तूर्तास बासनात गेला असल्याने ठाणेकरांची डबल डेकर बसमधून फिरण्याची स्वप्ने लांबणीवर गेली आहेत.

## वर्षानुवर्षे एकाच विभागात कार्यरत ५४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

यांच्या धडाकेबाज निर्णयामुळे महानगरपालिकेत प्रथमच प्रशासकीय सेवेत सहाय्यक आयुक्त या पदावर तीन जणांची वर्णी लागली आहे.

अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त डॉ.विजय खेडकर व सहाय्यक आयुक्त सुनील लोंढे यांनी सामान्य प्रशासन विभागाची अनेक वर्षांपासून रखडलेली पदोन्नतीची प्रक्रिया गतिमान केलेली असून पहिल्या टप्प्यात तीन सहाय्यक आयुक्त, दोन अधीक्षक,12 वरिष्ठ लिपिक, सहा वीजतंत्री आणि 17 तारतंत्री या पदांवर कर्मचाऱ्यांची पदोन्नती करून त्यांची येणारी दिवाळी गोड केली आहे.

## कल्याण पश्चिमेत ४,३४,९२८ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

सर्व साहित्य हे विधानसभा मतदार संघामध्ये जमा करुन पोलिस बंदोबस्तामध्ये विधानसभा कार्यालयातील स्ट्राँग रुममध्ये ठेवण्यात येणार आहे. कल्याण पश्चिम विधानसभेची स्टॉग रुम ही मुंबई विद्यापीठ सबसेंटर येथे असून याच ठिकाणी मतमोजणी देखील होणार आहे.

तसेच शासनाकडून व निवडणूक विभागाकडून जास्तीत जास्त मतदारांनी घराबाहेर पडून मतदान करावे यासाठी जनजागृतीच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी मागिल निवडणुकी पेक्षा चांगला प्रतिसाद देऊन 52टक्के मतदान झाले. विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 85 वर्ष वयावरील ज्येष्ठ नागरीकांना व 40 टक्के पेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या मतदाराकरीता गृह मतदानची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे निवडण्क कर्तव्यावर असलेल्या कर्मचा-यांकरीता व अत्यावश्यक सेवेमध्ये काम करणा-या मतदारांकरीता टपाली मतदानाची सुविधा करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील कंट्रोलरुमचा टोल फ्री क्रमांक 18002330117 असा असून 24 तास सेवा उपलब्ध असणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी दिली.

## कडोंमपा कर्मचाऱ्यांना १९,५०० रुपये बोनस

कर्मचारी, प्रतिनियुक्ती वरिल अधिकारी (मा. आयुक्त वगळून), रोजंदारी/ठोक पगारावरील, हंगामी, ठोकवेतन, वेतनश्रेणीतील अस्थायी कर्मचारी, परिवहन, प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, बालवाडी शिक्षिका/सेविका/दाई, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी, समूदाय संघटक/व्यवस्थापक, एनयुएचएम, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यकम, कुष्ठरोग निर्मुलन कार्यकम, राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यकम, कोविड-19 पदभरती अंतर्गत कर्मचारी, ठोकपणारी (ड्रेसर, स्टाफ नर्स, आया), अपत्ती व्यावस्थापन अधिकारी, सहाय्यक, शासनाकडील एम.पी.डब्ल्यु, 27गावातील कर्मचारी, कंत्राटी वाहनचालक, इत्यादी कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस मिळावा यासाठी महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्यानंतरच महायुती सरकारने सदर निर्णय घेतल्याचे समजते. "कल्याण-डोंबिवली शहर आणि या शहरातील नागरिकांसाठी महानगरपालिकेतील अधिकारी वर्षभर राबत असतात. एक डोंबिवलीकर या नात्याने त्यांच्या मेहनतीची काही अंशी परतफेड व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न करत होतो.

त्यानुसार महायुती सरकारने या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयामुळे आता या कर्मचाऱ्यांची दिवाळी अधिक गोड होईल, याचा आनंद आहे, असे ना. रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

## महायुतीने रिपोर्ट मांडला ; विरोधकांवर निशाणा साधला

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, रिपोर्ट कार्ड काढण्यासाठी हिंमत लागते, काम करावे लागते. आम्ही एवढी कामे केली की ती रिपोर्ट कार्डमध्येही मावत नाहीत. पायाभूत सुविधांमध्ये आज महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. अटल सेतू, समृद्धी महामार्ग, कोस्टर रोड यासारखे प्रकल्प महायुती सरकारने पूर्ण केले. महायुती सरकारचे काम वाखाणण्याजोगे आहे, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी सरकारच्या कामगिरीचा लेखाजोखा मांडला. तर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "स्थगिती सरकार गेल्यानंतर प्रगतीचे सरकार राज्यात आले. सरकारच्या गतीमुळे राज्याची प्रगती लक्षात आली. परिवर्तन करणाऱ्या योजना आम्ही आणल्या. शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. मविआने एकाही प्रकल्पाला सुधारित प्रशासकिय मान्यता दिली नसल्याने सिंचनाचे काम ठप्प होते. त्यामुळे 145 प्रकल्पांना आता मान्यता मिळाली असून, महाराष्ट्रातील सर्व दुष्काळी भागात या प्रकल्पांच्या कामांची सुरुवात करण्यात आली आहे, असे त्यांनी म्हटले.

## डहाणू विधानसभेसाठी पुन्हा विनोद निकोले यांना उमेदवारी जाहीर



### मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीची घोषणा

मतदारसंघात येतो. जिल्ह्याच्या सर्वच तालुक्यांत माकप केवळ महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्यासाठीच नव्हे, तर लवकरच होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये पक्षाला विजयी करण्यासाठीही सज्ज झाला आहे. दरम्यान, 9-10 ऑक्टोबर 2024 रोजी तलासरी येथील कॉ. गोदावरी शामराव परुळेकर भवन येथे झालेल्या माकपच्या ठाणे-पालघर जिल्हा कार्यशाळेने 20 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी एक पद्धतशीर प्रचार योजना तयार केली.

या कार्यशाळेत 11 तालुक्यांतून 75 हून अधिक महिलांसह 365 प्रमुख कॉम्रेड्स सहभागी झाले होते. 2019 च्या निवडणुकीत काय झालं? भाजपच्या पास्कल धणारे यांनी सीपीएमच्या विनोद निकोलेंना 2019 च्या निवडणुकीत काँटे की टक्कर दिली. पण या निवडणुकीत अवघा 4700 मतांनी पास्कल धानारेंचा पराभव झाला आणि विनोद निकोले विजयी झाले. भाजपाच्या पास्कल धानारे यांनी 44,849 मते मिळवून 2014 च्या निवडणुकीत सीपीएमच्या बारक्या मंगत यांचा पराभव केला. त्यांना या निवडणुकीत 28 हजार 149 मतं मिळाली.

2014 च्या विधानसभा निवडणुकीत डहाणूत सर्वच पक्ष स्वबळावर लढले होते. त्यामध्ये भाजप, शिवसेना, माकप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि माकपने तिकीट नाकारल्याने माजी आमदाराच्या पुत्राचा समावेश होता. त्यावेळी भाजपचे पास्कल धनारे (44849), माकपचे बारक्या मांगात (28149) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे काशीनाथ चौधरी (27963) यांच्यात लढत झाली होती. पास्कल धानारे यांना 16,700 मताधिक्य मिळाले होते.

# टोविंग व्हॅन कर्मचारी वाहनधारकावर गेला धावून

**भिवंडी :** भिंवडीतील असाच एक टोविंग कर्मचाऱ्याचा व्हिडिओ समोर आला असून तो अक्षरश: वाहनधारक नागरिकांच्या अंगावर धावून जात असल्याचे दिसून येते. यावेळी, स्थानिकांनी मध्यस्थी करुन हा वाद सोडवला. मात्र, या कर्मचाऱ्याचा मुजोरीपणा कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

भिवंडी शहरात वाहतूक कोंडीची समस्या नेहमीची झाली आहे. त्यातच रस्त्यालगत होणारी पार्किंग ही सुध्दा वाहतूक कोंडीसाठी डोकेदुखी ठरत आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांकडून नो पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी टोविंग व्हॅन शहरात फिरविण्यात येत असते. मात्र, बऱ्याच वेळा या टोविंग व्हॅन एकच रस्त्यावर घिरट्या घालताना दिसून येतात. तर या व्हॅनवरील पोलिस कारवाई करताना कोणत्याही सूचना न देता सर्रासपणे वाहन उचलत असल्याने अनेकवेळा हे वादाचे कारण ठरत आहेत.आता देखील टोविंग वाहनाच्या कर्मचाऱ्याने अरेरावी करत वाहनधारकास मारहाण करण्यासाठी हात उगारल्याचे एका व्हिडिओतून समोर आले आहे. त्यामुळे, या कर्चमाऱ्यांवर कारवाईची मागणीही केली जात आहे.

भिवंडी महानगरपालिकेच्या गेटसमोरील कोटर गेट रस्त्यावर बुधवारी दुपारी कोणतेही सायरन न वाजवता वाहतूक पोलिसांची टोविंग व्हॅन आली होती. कुठलीही पूर्वसूचना न देता किंवा कुठलेही सायरन न वाजवता येथील कर्मचारी रस्त्याच्या दुतर्फा, महापालिकेच्या बाहेर आडोशाला लावलेल्या दुचाकी उचलत असल्याचे निदर्शनास आल्याने एका वाहनधारकाने त्यास विरोध केला. त्यावेळी, या कर्मचाऱ्यांचा दुचाकी चालकासोबत वाद होवून त्यांच्यात हाणामारीची घटना घडली. हा सर्व प्रकार वाहतूक पोलिसांसमोर होत असताना ते शांतपणे हा सर्व प्रकार पहात बसले होते. त्यामुळे, उपस्थित नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावरही व्हायरल झाला असून नागरिकांना वाहतूक पोलिस व टोविंग वाहनाच्या कर्मचाऱ्यांबद्दल संतप्त शब्दात प्रतिक्रिया दिल्या आहेत.

## वाहनचोरी, घरफोडी चोराला अटक



**ठाणे :** नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहनचोरी आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी नौपाडा पोलिस तपास पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश भांगे व त्यांचा स्टाफ पोलिस हद्दीत पेट्रोलिंग करत होते.

नेमक्या त्याचवेळी हवालदार देसाई यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली, एक व्यक्ती नौपाडाच्या हद्दीत वाहन चोरीच्या उद्देशाने फिरत आहे. त्यांनी तत्काळ बातमीच्या अनुषंगाने सापळा रचला आणि शिताफीने नानू पठाडे (26) रा. म्हात्रे चाळ, कोपरखैरणे, नवी मुंबई याला ताब्यात घेतले आणि त्याची कसून चौकशी करताना त्याच्या खिशामध्ये 5 ते 6 विविध दुचाकी चाव्या मिळून आल्या. तो त्या ठिकाणी वाहन चोरीच्या उद्देशाने आल्याचे स्पष्ट झाल्यामुळे त्याच्याकडे तपास केला. त्याने नौपाडा परिसरात घरफोडी वाहन चोरी केल्याची कबूली दिली आहे.

तपासाच्या दरम्यान त्याच्याकडून दोन बजाज 220 पल्सर, एक पॅशन पीआरओ गाडी, एक बजाज प्लॅटीना गाडी अशा चार दुचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत. अटक आरोपीकडून चार गुन्हे केल्याचे उघड झाले आहे. आरोपींनी नौपाडा, कोपरखैरणे या हद्दीत गुन्हे केले आहे.

## महादेव जानकर महायुतीतून बाहेर, स्वबळावर लढणार!

**मुंबई :** विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा होताच महायुतीला मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी महायुतीतून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे. महादेव जानकर यांचा पक्ष आता राज्यात स्वबळावर निवडणूक लढवणार आहे. महायुतीतील जागावाटपावरून जानकर नाराज असल्याची चर्चा होती.

गेल्या काही दिवसांपासून महादेव जानकर हे महायुतीमध्ये नाराज असल्याची माहिती आहे. महायुतीकडे विधानसभेसाठी त्यांनी 40 ते 50 जागांची मागणी केली होती. पण त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळेच त्यांनी आता महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष आता राज्यात सर्व जागा स्वबळावर लढणार आहेत.



महादेव जानकरांनी लोकसभा निवडणूक ही महायुतीच्या माध्यमातून लढवली होती. मात्र परभणीतून त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर विधानसभेला आपल्या पक्षाला सन्मानजनक जागा मिळाव्यात यासाठी जानकर प्रयत्नशील होते. पण त्यांना अपेक्षित जागा मिळणार नाही असं लक्षात येताच त्यांनी महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

महायुतीला मोठा धक्का

महायुतीला रामराम केल्यानंतर आता महादेव जानकर यांचा पक्ष राज्यात किती जागा लढवणार हे पाहावं लागेल. परंतु महादेव जानकरांच्या या निर्णयामुळे महायुतीला मात्र मोठा धक्का बसल्याचं सांगितलं जातंय. आता भाजप आणि महायुतीकडून जानकरांची नाराजी दूर केली जाणार का हे पाहावं लागेल.

महायुतीतून बाहेर पडल्यानंतर महादेव जानकर यांनी प्रतिक्रिया दिली. आपल्याशी महायुती किंवा महाविकास आघाडीने संपर्क साधला नसून आपण आपल्या पक्षाच्या वाढीसाठी हा निर्णय घेतला आहे असं ते म्हणाले. महाराष्ट्रात 288 जागा लढवण्यासाठी आपण तयारी करत असल्याचे जानकर म्हणाले.

महादेव जानकर म्हणाले की, "लोकसभेला महायुतीने आम्हाला एक जागा दिली होती. पण आमचा पक्ष मोठा झाला पाहिजे, आमच्या पक्षाचा मुख्यमंत्री झाला पाहिजे यासाठी आम्ही तयारी करत आहोत.

## वेळूक ग्रामस्थांचे उपोषण अखेर स्थगित

### शहापूर तहसिलदारांची यशस्वी मध्यस्थी

**कसारा :** शहापूर तालुक्यातील वाशाळा जवळील वेळूक येथील ग्रामस्थांनी कसारा पोलिस स्टेशन बाहेर सुरु केलेले उपोषण शहापूर तहसिलदार परमेश्वर कोसुळे यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर स्थगित करण्यात आले आहे.

मौजे वेळूक येथील हनुमान मंदिर पाडून त्या ठिकाणी आमदार निधीतून मंजूर झालेले नूतन समाज हॉल (त्यातच हनुमान मंदिराचाही समावेश आहे) बांधण्यात येणार होते. मात्र पाडकाम करण्याआधी स्थानिक उपसरपंच प्रकाश भोईर आणि इतर काही ग्रामस्थांना विचारात घेतले नसल्याचा तसेच धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोप करीत ठेकेदार व पोट ठेकेदार यांच्या विरोधातील कारवाईच्या मागणीसाठी काही ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला होता. याबाबतचे वृत्त 'ठाणेवैभव'मध्ये प्रसिद्ध झाले होते.

दरम्यान कसारा पोलिस निरीक्षक सुनील बच्छाव यांनी उभय पक्षकारांमध्ये समन्वय होऊन गावात तणाव वाढू नये याकरिता शहापूर तहसिलदार श्री. कोसुळे यांना 'ते' बांधकाम थांबविण्याचे आदेश पारित करण्याची लेखी विनंती केली होती.

त्या नुसार तहसिलदारांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून अर्थात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मंदिराच्या जागी सुरु असलेले काम पुढील आदेश मिळेपर्यंत थांबविण्याचे आदेश दिले असल्याने उपोषणकर्त्यांनी मंगळवारीच उपोषण स्थगित केले आहे.

## हेरंब आरती मंडळाच्या सामूहिक आरतीला भाविकांची गर्दी



**अंबरनाथ :** आठवड्यातून एक दिवस महाआरतीसाठी एकत्र जमावे यासाठी केलेल्या प्रयत्नाला उत्स्फूर्त यश आले असून दर मंगळवारी मोठ्या संख्येने अंबरनाथकर भाविकांच्या साक्षीने होणाऱ्या महाआरतीच्या सुरात हेरंबचा गाभारा मंत्रमुग्ध होत आहे.

अंबरनाथच्या खेर विभागातील जुन्या आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या हेरंब मंदिरात दररोज सकाळी साडेसात आणि सायंकाळी साडेसात वाजता मंदिरात आरती होते. मंगळवार हा गणपतीचा वार असल्यामुळे सायंकाळी साडेसात वाजता महाआरती केली जाते. गेल्या दोन वर्षांपासून दर मंगळवारी महाआरती केली जाते.

मंदिरात महाआरती करावी अशी संकल्पना मंदिराचे सभासद रत्नाकर चांदस्कर आणि उमेश कुलकर्णी यांनी हेरंब सेवा समितीच्या विश्वस्तांसमोर मांडली. या संकल्पनेला विश्वस्तांकडून मंजुरी मिळताच एप्रिल 2022 मध्ये एका मंगळवारी महाआरतीचा मुहूर्त साधला गेला. पहिल्या मंगळवारी मोजक्या 10 ते 12 भाविकांच्या उपस्थितीत सुरु झालेल्या महाआरतीला 100 ते 150 भाविक उपस्थित रहातात. भाविकांच्या सोयीसाठी हेरंब आरती मंडळाची स्थापना देखील केली गेली.

दर मंगळवारी सायंकाळी बरोबर साडेसात वाजता मंदिरातील गणपती तसेच अन्य देव- देवतांच्या आरत्या, श्लोक यांच्या सामूहिक स्वरांनी मंदिर परिसराचे वातावरण मंत्रमुग्ध होऊन जाते.

महाआरतीच्या प्रसंगी कुणाचा लग्न वाढदिवस अथवा एखाद्या कौटुंबिक उपक्रम असल्यास भाविकाला आरती करण्याचा मान दिला जातो शिवाय समितीच्या वतीने मंदिरातील गुरुजींच्या हस्ते अशा व्यक्तींचा यथोचित सन्मान केला जातो. हेरंब मंदिराच्या वास्तूत एक दिवस सर्वांनी एकत्र यावे याच उद्देशाने महाआरती उपक्रमाला सुरुवात केल्याचे रत्नाकर चांदस्कर आणि उमेश कुलकर्णी यांनी नमूद केले.

## ठामपा शाळेतील विद्यार्थ्यांची पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती





**ठाणे :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 148-ठाणे विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 41 हिंदी भाषिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उथळसर परिसरात मुख्य रस्त्यावर मतदार जनजागृतीपर पथनाट्य सादर केले.

मतदान का आवश्यक आहे, सुयोग्य उमेदवार कसा निवडावा या बाबी पथनाट्याच्या माध्यमातून लोकांसमोर मांडण्यात आल्या. या पथनाट्यला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लोकांना लोकशाहीने मतदानाचा एक शक्तिशाली अधिकार दिला आहे. मतदान हा लोकशाहीच्या घोषणेचा आधारस्तंभ आहे. एखाद्याला खरोखरच राष्ट्र-निर्माण प्रक्रियेत सहभागी व्हायचे असेल आणि बदल घडवून आणायचा असेल तर मतदान करणे आवश्यक आहे. अशा संवादाने नागरिकांना आपल्या मताचे मोल त्याच्या ताकदीचा परिचय पथनाट्याद्वारे करून देण्यात आला.

या पथनाट्य कार्यक्रमात, मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असून मतदान आपला अधिकार आणि आपली जबाबदारी आहे याची जाणीव उपस्थित सर्व मतदारांना करून देण्यात आली. सर्वांनी आपल्या कुटूंबातील सदस्यांना, नातेवाईकांना व तुम्ही राहता तेथील आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे आणि सर्व मतदारांनी न चुकता 20 नोव्हेंबर 2024 रोजी अवश्य मतदान करावे, असे आवाहन त्यांना करण्यात आले.

## विबग्योर शाळा समूहाची सीबीडी बेलापूरमध्ये नवीन शाळा सुरू

**नवी मुंबई :** केजी ते बारावीपर्यंतच्या शाळांचे अग्रगण्य जाळे असलेल्या विबग्योर ग्रुप ऑफ स्कूल्सने सीबीडी बेलापूर येथे आपली नवीन शाळा सुरु करण्याची घोषणा केली आहे.




शाळेच्या आवारात आधुनिक प्रयोगशाळा, मल्टीमीडिया क्लासरूम आणि विस्तृत क्रीडा संकुलांसह अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. केवळ शैक्षणिक गुणवत्ताच नव्हे तर सर्जनशीलता, सुयोग्य विचारसरणी आणि नेतृत्व कौशल्ये वाढवणे, विद्यार्थ्यांना वेगाने विकसित होत असलेल्या जागतिक वातावरणात यशासाठी सज्ज करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे.

बेलापूर कॅम्पसमधील विबग्योर किड्स आणि विबग्योर हाय ही ब्रँडची नवी मुंबईतील तिसरी शाळा असून आपले जाळे विस्तारण्याबरोबरच या भागात दर्जेदार शिक्षण देण्याची आपली वचनबद्धता दर्शवते. विबग्योर किड्स बालवाडी शिक्षणाची पूर्तता करतांनाच पाया भक्कम करेल तर विबग्योर हाय उच्च श्रेणींसाठी सर्वसमावेशक सीबीएससी आणि आयसीएससी अभ्यासक्रम प्रदान करेल. अत्याधुनिक सुविधांसह समृद्ध शिक्षण अनुभव देणे आणि सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांना भविष्यातील यशासाठी सज्ज करणे हे नवीन शाळेचे उद्दिष्ट आहे.

विबग्योर ग्रुप ऑफ स्कूल्सचे संस्थापक अध्यक्ष रुस्तम केरावल्ला या प्रसंगी बोलतांना म्हणाले,"सीबीडी बेलापूरमध्ये आमच्या नवीन शाळेचा शुभारंभ हा विबग्योरसाठी एक महत्त्वाचा मैलाचा दगड आहे. ही संस्था केवळ आमच्या शाळांमध्ये भर घालणारी नाही; तर दर्जेदार शिक्षण देण्याचा आमचा 20 वर्षांचा वारसा चालू ठेवणारी आहे. या महत्वपूर्ण घडामोडीमुळे केवळ भारतातच आमच्या कक्षा रुंदावनार नाहीत तर संपूर्ण महाराष्ट्रात आमचे मजबूत जाळे विस्तारणार आहे.

## हिमालया वेलनेसतर्फे पार्टी स्मार्ट मोहीम सुरू

**ठाणे :** 'हिमालया वेलनेस'ने 'पार्टी स्मार्ट'मोहीम सुरु केली आहे, ज्यात प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेते आदित्य रॉय कपूर स्मार्ट आणि सुरक्षित पार्टीसाठी 'पार्टी गुरु' म्हणून दर्शवण्यात आले आहेत.

'हिमालया वेलनेस'ने 'पार्टी स्मार्ट'साठी आपल्या नवीन डिजिटल व्हिडिओ मोहिमेसह (डीव्हीसी) स्मार्ट पार्टीला प्रकाशझोतात आणले आहे. विशेष म्हणजे प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेता आदित्य रॉय कपूर या मोहिमेत 'पार्टी गुरु' म्हणून प्रेक्षकांसमोर आपली अनोखी छबी उमटवत आहेत. या मजेदार आणि जोशपूर्ण मोहिमेत आदित्य मुख्य भूमिकेत असून, आपल्या मोहक आणि विनोदी शैलीत तो पार्टीबद्दलच्या लोकप्रिय गैरसमजांवर स्पष्टीकरण देत 'पार्टी स्मार्ट'चे हर्बल रहस्य सांगत आहे.

पार्टीला येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे आदित्य या वेळी देतो. चांगला वेळ कसा घालवायचा पासून ते दुसऱ्या दिवशी ताजेतवाने कसे रहायचे आदी प्रश्नांचा यामध्ये समावेश असतो. 'पार्टी स्मार्ट'मधील हर्बल सूत्राद्वारे पार्टीनंतर दुसऱ्या दिवशीही कसे छान वाटते हे देखील दाखवण्याचा प्रयत्न तो करतो.

'पार्टीस्मार्ट'चा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून आदित्य रॉय कपूर यांनी या मोहिमेबद्दल सांगितले की, 'मला लक्षात आले आहे की, सर्वोत्कृष्ट पार्ट्या अशाच असतात जिथे प्रत्येकाला दुसऱ्या दिवशी छान वाटते. 'पार्टी स्मार्ट' एक गेम-चेंजर असून, जो तुम्हाला तुमच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड न करता सामाजिक कार्यक्रमांचा आनंद घेऊ देतो. तुम्ही नेहमीच पार्टीला जाणारे असाल किंवा अधूनमधून पार्टीचा आनंद घेणारे असाल, 'पार्टी स्मार्ट' एक आदर्श साथीदार म्हणून काम करते. जबाबदार समाजीकरणाचा अनुभव स्वीकारण्याची हीच वेळ आहे.'

# कडोंमपा क्षेत्रातील घनकचरा प्रकल्पाचा नेदरलॅन्डच्या शिष्टमंडळाने केला पाहणी दौरा




**कल्याण :** किंगडम ऑफ नेदरलॅन्डचे कॉन्सुलेट जनरल थेअरी व्हॅन हेल्डन व इतर शिष्टमंडळाच्या निवेदनानुसार घनकचरा व्यवस्थापनाबाबत कल्याण- डोंबिवली महानगरपालिका राबवत असलेल्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शिष्टमंडळ व नेदरलॅन्ड मधील इतर कंपन्यांनी नेदरलॅन्डमध्ये राबवण्यात येणाऱ्या घनकचरा प्रकल्प, वेस्ट टु एनर्जी प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प, हवा प्रदूषण नियंत्रण उपकरणे तसेच क्लिअर रिवर, पर्यावरण विषयक दृकश्राव्य माध्यमातून सादरीकरण करून हवा व पाणी प्रदूषण नियंत्रण व नदी स्वच्छता कशी राखता येईल व त्यासंबंधीच्या उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. याकामी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांची माहिती दिली.

यावेळी महापालिका आयुक्त डॉ.इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देवीदास पवार, कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील, कार्यकारी अभियंता योगेश गोटेकर, उल्हासनगर महानगरपालिकेच्या सहा. आयुक्त मयुरी कदम उपस्थित होते. संबंधित शिष्टमंडळाने महापालिका अधिकाऱ्यांसमवेत उंबर्डे, बारावे एकात्मिक घनकचरा प्रकल्प, आधारवाडी बायोमायनिंग प्रकल्प तसेच वालधुनी नदीची पाहणी केली. देशभरात घनकचरा प्रक्रिया प्रकल्प राबवणेकामी महाराष्ट्र सरकार व नेदरलॅन्ड सरकार यांनी सामंजस्य करार केला आहे.

भारतामध्ये प्रतीवर्षी सुमारे 60 मिलियन मेट्रीक टन घनकचऱ्याची निर्मिती होत आहे. देशातील घनकचऱ्याची जटिल समस्या सोडवण्यासाठी भविष्यात काय उपाययोजना करता येतील याचा विचार करता आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे मत नेदरलॅन्डच्या शिष्टमंडळाने व्यक्त केले. याकामी केंद्र शासनामार्फत तसेच एमएमआरडीएच्या माध्यमातून निधी प्राप्त झाल्यावर महापालिका क्षेत्रात टप्प्याटप्प्याने ही कामे हाती घेण्यात येतील, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ.इंदुराणी जाखड यांनी दिली. या पाहणी दौऱ्याचा कल्याण- डोंबिवली महापालिका व एमएमआर क्षेत्रामध्ये निश्चित फायदा होणार आहे.



## उल्हासनगरमध्ये रंगले आंबेडकरी साहित्य संमेलन

**पडघा :** उल्हासनगरमध्ये मध्ये साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. संजय अपरांती यांनी केले.

"आंबेडकरी साहित्य संमेलन म्हणजे एक प्रकारे संसदीय अधिवेशन असून येणारा प्रत्येक साहित्यिक हा आमदार, खासदारच आहे. त्यामुळे चळवळ जिवंत राहते", असे डॉ. अपरांती म्हणाले. या साहित्य संमेलनाचे मुख्य संयोजक अनिल भालेराव आंबेडकरी साहित्य संमेलनाची भूमिका मांडताना म्हणाले," स्वबळावर आंबेडकरी साहित्य घेतले तर चळवळ कोणाची बटीक होत नाही. आंबेडकरी विचार रुजवायचे असतील तर स्वाभिमानी साहित्यिकच साहित्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न मांडू शकतात."

या साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष प्रा. आनंद देवडेकर यांनी पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ते पुढे म्हणाले, शासन कोणत्याही पक्षाचे असो आपण त्यांचे निरपेक्ष भावनेने पाली भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल अभिनंदन केले पाहिजे. आंबेडकरी साहित्य हेच बौद्ध साहित्य असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

या साहित्य संमेलनात राज्यघटना, आंबेडकर साहित्याचे योगदान या विषयांवर प्रा. दफेदार अकिफ, प्रा. प्रेमरत्न चौकेकर, प्रा. प्रज्ञाकिरण वाघमारे, डॉ. आशा ब्राह्मणे यांनी आपले विचार मांडले. तर कवी संमेलनाचे अध्यक्षपद प्रा. उत्तम भगत यांनी भूषवले. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून आलेल्या कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून जनसामान्यांची भावना मांडली. उदघाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. अनिल कवठेकर यांनी केले. तर कथकथान संवादाचे सूत्रसंचालन प्रिती माने यांनी केले. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन मिलिंद जाधव यांनी केले. संमेलन यशस्वी करण्यासाठी सुनील दुपटे, शामराव सोमकुवर यांनी परिश्रम घेतले.




# जागतिक पांढरी काठी दिन डोंबिवलीत उत्साहात साजरा

**डोंबिवली :** रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटी, जीवन आधार सामाजिक संस्था, एस आर एस फायनान्शिअल सर्व्हिसेस व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली हेरिटेज या संस्थांच्या वतीने एकत्रितपणे 'जागतिक पांढरी काठी दिन' शंभर अंध बांधवांना पांढरी काठी वाटप करून अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

समाजामधे पांढ्या काठीबद्दल जागरूकता निर्माण व्हावी यासाठी इनसाईट फाउंडेशनचे हेमंत पाटील, अध्यक्ष अरविंद नेरे यांच्या पुढाकाराने अंध बांधवांची रॅली प्र. के. अत्रे ग्रंथालय वरून गणेशमंदिर मार्गे सावरकर उद्यान अशा मार्गाने काढण्यात आली. रॅलीमध्ये रोटरी क्लब ऑफ डोंबिवली सिटीचे अध्यक्ष रो. संजय मांडेकर, सेक्रेटरी रो.आशिष देशपांडे, जीवन आधार संस्थेचे अध्यक्ष उमेश चव्हाण, सेक्रेटरी राहुल कराडकर, एस आर एस फायनान्शिअल सर्व्हिसेसचे डायरेक्टर संतोष चपटे, रमेश प्रजापती, रोटरी क्लब ऑफ डोंबिवली हेरिटेजचे अध्यक्ष रो. दीपक ठक्कर सहभागी झाले होते. तसेच त्यांनी रॅली मधील सर्व अंध बांधवांना मार्गदर्शन केले.

काठी वाटपाचा कार्यक्रम सावरकर उद्यानात पार पडला. याप्रसंगी व्हिजन इनसाईट फाउंडेशनच्या वतीने अलका हेमंत पाटील यांच्या स्मरणार्थ "Valuable Humanitarian Service Award- 2024" हा पुरस्कार जीवन आधार संस्थेचे उमेश चव्हाण, राजयोग फाउंडेशनचे डॉ. राहुल घाटवाळ, गणेश मंदिर संस्थान व केळकर कॉम्प्युटर्सचे राजीव केळकर यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश चव्हाण यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी प्रकाश हिंगणे, रो. संजय मांडेकर, संतोष चपटे, रो. दीपक ठक्कर यांच्या हस्ते काठी वाटप करण्यात आले. कार्यक्रमास 100 पेक्षा अधिक अंध बांधव उपस्थित होते.

## कल्याणमध्ये माता रमाईंच्या पुतळ्याबाबत मुख्यमंत्री सकारात्मक

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील माता रमाबाई आंबेडकर उद्यानात माता रमाईंचा पुतळा उभारण्याची मागणी अजिंठा फाऊंडेशनच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून केली जात आहे. याबाबत आमदार विश्वनाथ भोईर यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे माता रमाईंच्या पुतळ्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मकता दर्शवली आहे.

अजिंठा फाउंडेशनचे अध्यक्ष समाजसेवक अजय सावंत यांच्यासह त्यांचे सहकारी आणि आंबेडकरी जनतेच्या वतीने अनेक वर्षापासून कल्याणमधील जनता माता रमाई आंबेडकर उद्यानात माता रमाई यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा याची मागणी करत आहेत. याबाबत त्यांनी आ. भोईर यांना देखील पत्रव्यवहार केले होते. तेव्हा आमदारांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन पुढे मुख्यमंत्र्यांनाही माता रमाई यांचा पुतळा उभारण्याची मागणी केली आणि मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवली आहे. याबाबत अजय सावंत यांनी कल्याणकरांच्या वतीने मुख्यमंत्री आणि आ. विश्वनाथ भोईर यांचे आभार मानले असून लवकरच या पुतळ्याचे काम सुरु होईल अशी आशा व्यक्त केली आहे.

# वाचन प्रेरणादिनी उत्कृष्ट वाचन यमुना स्मृती पुरस्कार



**कल्याण :** मातोश्री वेलबाई देवजी हरिया कनिष्ठ महाविद्यालय शहाड येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने उत्कृष्ट वाचन, मी वाचलेले पुस्तक हा उपक्रम घेण्यात आला. ज्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट वाचन केले त्यांना "यमुना स्मृती पुरस्कार" देऊन गौरविण्यात आले.

उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी आपण वाचलेल्या पुस्तकातील काही महत्त्वाचे मुद्दे, आवडलेली वाक्ये, त्यांना मिळालेली माहिती व प्रेरणा याविषयी लेखन केले आणि त्यांच्या लेखनाचे वाचन केले. त्यातून ज्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट वाचन केले त्यांना डॉ. गिरीश लटके (साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते) यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ "यमुना स्मृती पुरस्कार" दिले. प्रथम क्रमांक महिमा भोईर, द्वितीय क्रमांक श्रेया केणे, तृतीय क्रमांक मयुरी पटाईत, उत्तेजनार्ध चंचल भोईर आणि हर्ष मालवी यांनी उत्कृष्ट वाचन केले. हे विद्यार्थी यंदाचे मानकरी ठरले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील रोख रक्कम, प्रमाणपत्र, पुस्तक भेट देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्रसंगी डॉ. गिरीश लटके यांनी आपण आपल्या आईचे कष्ट, तिची शिकण्याची जिद्द आणि वाचनावर असलेली श्रध्दा, वाचनाने आपल्यावर होणारे संस्कार याबद्दल माहिती सांगितली. प्रस्तावनेत प्राचार्या कल्पना सोमनाचे यांनी वाचनाने आपली शब्द समृद्धी वाढते. लेखन व भाषण कौशल्य विकसित होते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे अवांतर वाचन केले पाहिजे. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून हा दिवस पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येतो असे सांगितले.

बी. एड. प्रा. वैशाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रंथपाल अनघा मोडक यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील विविध साहित्य प्रकारांची पुस्तके उपलब्ध करून दिली. कोणत्या पुस्तकातून आपणास काय माहिती मिळते याविषयी मार्गदर्शन केले. प्रा. बबन पाटील यांनी सूत्रसंचालन केले.


## भिवंडी महापालिकेत वाचन प्रेरणा दिन साजरा

**भिवंडी :** माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयात प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

सन 2015 पासून माजी राष्ट्रपती स्व.डॉ. ए.पी. जे अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने 15 ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानुसार अजय वैद्य यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्व विषद केले व सर्वांनी किमान एक तास तरी अवांतर वाचन करावे असे आवाहन देखील केले. महानगरपालिकेच्या मुख्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमामध्ये महानगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या वतीने विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. आयुक्त अजय वैद्य, अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त (वाचनालय) प्रणाली घोंगे, प्र.शहर अभियंता सचिन नाईक, कार्यकारी अभियंता पटणावार, प्र.सहा.आयुक्त (प्रशासन) अजित महाडीक, प्र.सहा.आयुक्त (निवडणूक) नितीन पाटील, प्र.सहा.आयुक्त (आरोग्य) फैसल तातली, प्र.सहा.आयुक्त (समाज कल्याण) तथा जनसंपर्क अधिकारी, सहा.आयुक्त (कर मूल्यांकन) सुधीर गुरव, प्र.सहा.आयुक्त (शिक्षण) प्रकाश राठोड, प्र.ग्रंथालय विभाग प्रमुख स्नेहल पुण्यार्थी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाणेवैभव BALवैभव



मुलांचा स्क्रिन टाईम कमी करूया..
आजच बालवैभव वाचूया!
DOMS SHARP MINDS
प्रायोजक
WAVIKAR EYE INSTITUTE Since 1992
नेत्र ज्योती - जीवन ज्योती
NABH Accredited Super speciality Eye Institute

### English worksheet


**Have or Has?**

| has | have |
|---|---|

Q. Complete the sentences with correct from of verb.

11. She _____ a meeting at right now.
12. Anna _____ many good friends.
13. May _____ a pet parrot.
14. They _____ gone to the railway station.
15. Joe _____ gone to the school.
16. _____ they left yet?
17. we _____ a great parents.
18. Do you _____ a pen?
19. I _____ a latest iPhone.
20. We _____ a nice apartment.

### Join the Dots



### Hindi worksheet


दिए गए अनेक शब्दों के लिए एक शब्द लिखिए।

1. घोड़ा चलाने वाला - घुड़सवार
2. आग बुझाने वाला - ...............
3. पत्र बाँटने वाला - ....................
4. सर्जरी करने वाला - ..................
5. घड़ी ठीक करने वाला - ...............
6. लोहे का काम करने वाला - ............
7. विद्युत उपकरण ठीक करने वाला - ..................
8. वाद्ययंत्र बजाने वाला - ................
9. शेरों का शिकार करने वाला - ....................
10. कांच का काम करने वाला - ..................

### सामान्य ज्ञान व उत्तरे

1. आपल्या सूर्यमालेतील सर्वात मोठा चंद्र कोणता आहे?

2. सापेक्षतेचा सिद्धांत कोणी दिला?



प्रश्नांची उत्तरे

1. गॅनिमेड
2. अल्बर्ट आइन्स्टाईन

### Maths worksheet

**Multiplication Drills**

19 x 5 = ☐ 23 x 6 = ☐

37 x 9 = ☐ 88 x 4 = ☐

79 x 7 = ☐ 91 x 6 = ☐


28 x 9 = ☐ 75 x 7 = ☐

48 x 5 = ☐ 57 x 4 = ☐

85 x 7 = ☐ 40 x 8 = ☐

72 x 8 = ☐ 43 x 5 = ☐

### What Cames Next




### Colour it



### Word Puzzle


**C WORDS**

FIND THE WORD

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| D | C | L | O | C | K | D | T | C | F |
| C | A | M | P | I | N | G | H | T | D |
| B | F | N | C | R | C | O | C | B | R |
| I | W | O | C | H | C | S | A | Q | A |
| O | I | M | E | O | I | S | K | I | C |
| V | N | L | L | I | C | L | E | G | C |
| V | C | A | R | R | O | T | D | R | E |
| L | T | N | V | A | R | A | O | G | H |
| E | V | E | T | S | F | W | A | S | T |
| E | O | L | T | Z | N | C | F | A | S |

COW CARROT CARD CAGE CROWN CAMPING CAKE CHILD CLOCK CHOCOLATE

### Find the way



**आम्हा घरी धन । शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे । यत्ने करू।।**

# इच्छुकांची व्यथा

महायुती विरुद्ध महाआघाडी अशी सरळ लढत होणार असल्याने इच्छुकांचा आत्मविश्वास दुणावणे स्वाभाविक आहे. आपल्यामागे तीन पक्षांची एकत्र ताकद एकटवली तर आमदार होण्याचे स्वप्न पूर्ण होईल ही त्यांना आशा आहे. यामुळे इच्छुकांची गर्दी वाढणार आहे. ज्यांची तरीही तिकीट मिळणार नाही अशी याची खात्री झाली आहे ती मंडळी पक्षांतर करू लागली आहेत. गेल्या काही दिवसांत पक्ष-प्रवेशाच्या बातम्यांचा सुकाळ झाला आहे आणि यापैकी एकही पक्षप्रवेश अमक्या नेत्याबद्दल वाटणाऱ्या प्रेम अथवा आदरापोटी नाही. हे पक्षांतर शुद्ध स्वार्थी हेतूने झाले असून त्यामागे पक्षनिष्ठा, तत्वांवर विश्वास वगैरे नाही. हा सरळसरळ सौदा आहे आणि त्यामुळे त्यांची सांगड राजकीय स्वार्थाशीच घालावी लागेल.

प्रत्येक पक्ष आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या कंपुत किती अस्वस्थता आहे, कोण असंतुष्ट आहे, कोण वंचित रहात आहे वगैरेची बित्तंबातमी ठेवत असतात, त्याप्रमाणे संबंधित इच्छुकांना निरोप धाडले जात असतात आणि तिकिटाचे प्रलोभन दाखवून त्यांना आपले करून घेतले जात असतात. यामागे कोणतेही निःस्वार्थ प्रेम किंवा न्याय देण्याची भूमिका नसते. अशा इच्छुकांना समजवण्याचे मोठ्या जिकरीचे काम प्रत्येक पक्षातील प्रमुख नेत्यांना करावे लागत आहे. तिथे त्यांचा गोंधळ होत असतो कारण उमेदवार ठरवण्याचे कोणतेच निकष पक्षाकडे नसतात. त्यामुळे ते इच्छुकांची समजूत घालण्यात अयशस्वी ठरतात. उदाहरणार्थ एखाद्या निष्ठावंत आणि मेहनती तसेच ज्येष्ठ कार्यकर्त्यास निवडणूक लढविण्याची इच्छा असेल तर त्याला तिकीट नाकारताना कोणतेही समाधानकारक कारण सांगितले जात नाही. ठाणे जिल्ह्यात १८ जागा आहेत. त्यापैकी किमान डझनभर जागांवरील विद्यमान उमेदवार तिसऱ्यांदा नशीब अजमावू पहात आहेत, त्यांनाच पुन्हा का, असा प्रश्न इच्छुक विचारतात कारण त्यांना डावलले तर ते पाच वर्षे मागे फेकले जातात, त्यांची उमेद संपून जाते. त्यांच्यासाठी आता नाही तर कधी नाही ही गत असते. पक्षाने आपली कदर ठेवावी असे त्यांना वाटत असते. परंतु हा विचार कधी सर्व्हेच्या नावाखाली तर कधी इलेक्टीव्ह मेरीटच्या सबबीखाली होत नाही. असे इच्छुक मग पक्षांतराचा किंवा बंडखोरीचा मार्ग स्वीकारतात.

तीन-तीन पक्षांनी मिळून महायुती आणि महाआघाडी केली आहे. एकाच पक्षातील इच्छुक हे महत्त्वाकांक्षेने प्रेरित असतात. तो पक्षांतर्गत मामला असतो. परंतु महायुती आणि महाआघाडीतील घटक पक्षांमध्ये एकापेक्षा अधिक इच्छुक दावेदार ठरतात. दोन पक्षांमध्ये अशावेळी तेढ निर्माण होत असते. अशी अनेक प्रकरणे झाली तर महायुती आणि महाआघाडी संकटात येऊ शकते. जागावाटप हा जळता कोळसा आहे, तो कोणीच हातात घ्यायला धजावत नाही.

## 'निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे'

### निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांचे निर्देश



**कल्याण :** निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने सहकार्याने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी दिले.

सार्वत्रिक विधानसभा निवडणुका 2024 ची आदर्श आचारसंहिता भारत निवडणूक आयोगाने जाहीर केली. त्याअनुषंगाने कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघात नियुक्त नोडल अधिकारी यांची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांच्या अध्यक्षतेखाली डोंबिवली येथील वै. ह भ प सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील कार्यालयात झाली. त्यावेळी श्री. गुजर यांनी हे निर्देश दिले.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 22 ते 29 ऑक्टोबर या कालावधीत इच्छुक उमेदवारांची नामनिर्देशन पत्र स्विकारली जाणार आहेत. 30 ऑक्टोबर रोजी अर्जाची छाननी, 4 नोव्हेंबर रोजी अर्ज माघार, 20 नोव्हेंबर रोजी मतदान व 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी असा निवडणुकीचा कार्यक्रम आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने सहा. आयुक्त तथा नोडल अधिकाऱ्यांनी सार्वजनिक मालमत्ता, खाजगी मालमत्ता व शासकीय मालमत्तेवरील पोस्टर्स, बॅनर्स, कट ऑऊटस् इ. त्वरीत काढण्याची कारवाई करावी. तसेच कोनशिलेवरील राजकीय पदाधिकारी, पक्षाचे नाव असेल तर ते झाकण्याची कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा. त्याचप्रमाणे "सीव्हीजील ॲपवर" प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे त्वरीत निराकरण करण्याचे निर्देश कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी या बैठकीत दिले.

झोनल अधिकारी यांच्या समवेत झालेल्या बैठकीत आपल्या अखत्यारीतील मतदान केंद्राची पाहणी करुन या मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत याची पुन्हा खातरजमा करुन तसा अहवाल सादर करण्याबाबत निर्देश श्री.गुजर यांनी दिले. या बैठकीस महापालिकेचे उप आयुक्त प्रसाद बोरकर, सहा. पोलीस आयुक्त (डोंबिवली) सुहास हेमाडे, पोलीस विभागातील इतर वरीष्ठ अधिकारी, कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या सहा. निवडणूक निर्णय अधिकारी श्रध्दा चव्हाण, गट विकास अधिकारी तथा सहा.निवडणूक निर्णय अधिकारी संजय भोये, महापालिकेचे उपअभियंता तथा सहा.निवडणूक निर्णय अधिकारी राजू राठोड, सहा.आयुक्त संजयकुमार कुमावत, चंद्रकांत जगताप तसेच इतर समन्वय अधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या थकित बोनससाठी सुरु असलेले उपोषण स्थगित



**मुरबाड :** तालुक्यातील 500 शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सर्व्हर डाऊन असल्याने न झाल्याने हे शेतकरी बोनसपासून आजपर्यंत वंचित राहिले. त्यांच्यासाठी लोकमित्र रमेश हिंदुराव यांनी सुरु केलेले उपोषण मुरबाडचे नवनिर्वाचित तहसीलदार अभिजित देशमुख यांनी दिलेल्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले आहे.

मुरबाड तालुका शेतकरी संघ लिमिटेड यांनी सन 2020 -21 मध्ये शेतकऱ्यांचे भात खरेदी केले. यातील 500 शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी न झाल्याने ते बोनस पासुन आजपर्यंत वंचित राहिले. ऑगस्ट 2022 पासून धरणे-आंदोलने, पत्र व्यवहार, उपोषणे करून नागपूर हिवाळी अधिवेशन 2022 मध्ये अन्न नागरी पुरवठा मंत्री मा.रवींद्र चव्हाण तसेच 2023 मध्ये उपमुख्यमंत्री मा.अजित पवार, त्याचप्रमाणे अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शेतकऱ्यांना न्याय देऊ असे आश्वासन दिले. त्याची पुर्तता होत नसल्याने ऑगस्ट 2024 रोजी आझाद मैदान येथे उपोषण केले असता मंत्रालयाच्या दालनात उपसचिव राजश्री सारंग, कक्ष अधिकारी विजय मोरे, मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड व्यवस्थापक मा.भोकरे यांच्या समवेत बैठक झाली. त्यांनी दिलेल्या आदेशानुसार मार्केटिंग फेडरेशन यांनी दिलेल्या पत्राप्रमाणे शेतकऱ्यांचे भात घेतले असून त्याची रितसर नोंदणी असल्याचे NemL यांनी कळवले. याबाबतचा अहवाल मार्केटिंग फेडरेशन यांनी 30 सप्टेंबर 2024 रोजी अन्न नागरी पुरवठा विभागास सादर केला आहे. त्या अन्वये कार्यवाही करून शेतकऱ्यांना बोनसचे पैसे मिळावेत यासाठी लोकमित्र रमेश हिंदुराव यांनी आपल्या शेतकरी मित्रांसोबत उपोषण सुरु केले होते. या उपोषणाची दखल घेत मुरबाडचे नवनिर्वाचित तहसीलदार अभिजित देशमुख यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारले. मागण्यांच्या निवेदनावर मंत्री महोदयांची सही झाली असून पत्र आल्यावर तात्काळ लेखी पत्र दिले जाईल, असे आश्वासित करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी तात्पुरत्या स्वरुपात उपोषण स्थगित केले आहे.

## संत निरंकारी मिशनतर्फे २४९ युनिट रक्तदान

**कल्याण :** 'रक्त नाड्यांमध्ये वाहू दे, नाल्यांमध्ये नको' या बाबा हरदेवसिंहजी यांच्या दिव्य उद्घोषाला कृतीत उतरवत संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या माध्यमातून द्वारलीपाडा कल्याण पूर्व व पवई येथे आयोजित दोन रक्तदान शिबिरांमध्ये 249 निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले.

फाउंडेशनने आयोजित केलेल्या संत निरंकारी सत्संग भवन, द्वारली पाडा, कल्याण (पूर्व) येथील रक्तदान शिबिरात 119 निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्स्फूर्त भावनेने रक्तदान केले. ज्यामध्ये 90 पुरुष तसेच 29 महिला रक्तदात्यांचा समावेश होता. या शिबिरामध्ये संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले यांच्याकडून रक्त संकलन करण्यात आले. या शिबिरामध्ये द्वारली पाडा सह भाल, वसार, नेवाळी, धामटाण, बुर्दूल व जवळपासच्या परिसरातील निरंकारी भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला.

डोंबिवली क्षेत्रीय प्रभारी रावसाहेब हसबे यांच्या हस्ते या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सेवादल क्षेत्रीय संचालक जनार्दन म्हात्रे, सेक्टर संयोजक किशन नेनवाणी व जगन्नाथ म्हात्रे तसेच स्थानिक ब्रँचचे मुखी दशरथ म्हात्रे आदी उपस्थित होते. स्थानिक समाजसेविका सुलभा गायकवाड, अंबरनाथ पंचायत समितीचे माजी उप सभापती सुरेश पाटील आदी मान्यवरांनी या शिबिराला भेट दिली आणि मिशनच्या कार्याचे कौतुक केले.

## धम्म शिक्षणाचा प्रसार: मोफत पुस्तक वाटप



**कल्याण :** धम्मचक्र प्रवर्तन दिवस आणि विजयदशमीच्या मुहूर्तावर आसरा फाउंडेशनच्या माध्यमातून नवी मुंबईतील नागरिकांना मोफत धम्म पुस्तके वाटप करण्यात आली.

या उपक्रमामुळे नवी मुंबईतील नागरिकांमध्ये धम्म शिक्षणाची चळवळ उफाळून आली. मोठ्या संख्येने नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून धम्म ग्रंथ स्वीकारले. या ग्रंथांमधील ज्ञान त्यांच्या जीवनात नवा दृष्टिकोन निर्माण करण्यास मदत करेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

आसरा फाउंडेशनचे विश्वस्त मोहन शिरकर यांनी यावेळी सांगितले की, "आम्ही भविष्यातही अशाच प्रकारचे मोफत पुस्तक वाटप कार्यक्रम विविध ठिकाणी आयोजित करणार आहोत. धम्म शिक्षण हा सर्वांसाठी खुला असून याचा प्रसार करणे ही आमची जबाबदारी आहे."

## लिटल आर्यन्स प्री-के विद्यारंभाने जपली प्राचीन भारतीय परंपरा



**कल्याण :** लिटल आर्यन्स प्री-के ही एक अग्रगण्य शिक्षण संस्था असून त्यांनी त्यांच्या मोरिवली कॅम्पस येथे दसऱ्याच्या मुहूर्तावर विद्यारंभमची प्राचीन भारतीय परंपरा साजरी केली.

सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्व असलेला हा समारंभ मुलांच्या शैक्षणिक प्रवासाची औपचारिक सुरुवात करतो. विद्यारंभम समारंभात मुलांनी तांदळाच्या दाण्यांवर त्यांची पहिली अक्षरे लिहिण्याच्या उपक्रमात भाग घेतला, जो त्यांच्या शिकण्याच्या प्रवासाच्या प्रारंभाचे प्रतीक आहे.

परंपरेनुसार, प्रत्येक मुलाच्या जिभेवर सोन्याचे नाणे वापरून "ओम" हा पवित्र शब्द कोरला गेला, तर शिक्षक आणि पालकांनी गायत्री मंत्राचा उच्चार केला. या कार्यक्रमाने कुटुंब, शिक्षक आणि विद्यार्थी एकत्र आले. यावर्षीच्या विद्यारंभम समारंभाच्या यशस्वी समारोपासह लिटिल आर्यन्स प्री-केने 2025-26 या शैक्षणिक वर्षासाठी अधिकृतपणे प्रवेश प्रक्रिया सुरु केली.

## आयसीएसआयच्या ठाणे चॅप्टरचा स्थापन दिवस साजरा





**ठाणे :** आयसीएसआयच्या WIRC ठाणे चॅप्टरचा 22वा स्थापन दिवस ठाणे क्लब येथे नुकताच साजरा झाला. यावेळी ICSI च्या वेस्टर्न इंडियन रिजनल कौन्सिलच्या सहकार्याने "स्ट्रेंथनिंग गव्हर्नन्स, एलिव्हेटिंग प्रोफेशनलिझम: A Path to Risk-Free Leadership" या थीमवर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रादेशिक परिषदेच्या सदस्यांसह संपूर्ण पश्चिम विभागातील कंपनी सचिवांची उपस्थिती होती. आपल्या स्वागतपर भाषणात WIRC चे अध्यक्ष CS मेहुल राजपूत यांनी कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल ठाणे चॅप्टर टीमचे अभिनंदन केले आणि निवडलेली थीम अत्यंत समर्पक असल्याचे सांगितले. ठाणे चॅप्टरच्या अध्यक्षा स्वाती निवलकर यांनी सर्व सदस्य, सन्माननीय पाहुणे आणि विभागीय परिषद सदस्यांचे स्वागत केले. त्यांनी प्रायोजकांचे त्यांच्या पाठिंब्याबद्दल आभार मानले आणि सदस्यांना कंपनी सेक्रेटरीज बेनेव्होलंट फंड (CSBF) मध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहित केले. कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी अधिक करिअर जागरुकता कार्यक्रम आयोजित करण्यात मदत करण्यासाठी सदस्यांना आवाहन केले.

बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक पी. आर. राजगोपाल यांनी ठाणे चॅप्टरच्या 22 व्या स्थापना दिनानिमित्त प्रशंसा केली. यावेळी पॅनल डिस्कशनमध्ये सीएस जिगर शाह, सीएस सुजित जैन, सीएस अंगना अरोरा, सीएस शशिकांत थोरात, सीएस राहुल सहस्त्रबुद्धे, सीएस मकरंद जोशी, सीएस रुपा जोशी, सीएस श्रीकांत शर्मा, अनिता रामचंद्रन सहभागी झाले होते.

## गरजूंना अन्नधान्य कीट व मिठाईचे वाटप

**कल्याण :** श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट कल्याणतर्फे सालाबादप्रमाणे यंदाही संस्था संचालक व मान्यवरांच्या हस्ते गरजू लोकांना अन्नधान्यांचे कीट व दिवाळी निमित्त मिठाई, फराळ वितरण करण्यात आले.

आधारवाडी येथे असलेल्या अन्न छत्रात गेल्या अनेक वर्षांपासून दररोज गरजू लोकांना भोजन व दरमहा अन्नधान्य कीटचे वितरण करण्यात येते. या संस्थेचे सेवा कार्य मानव सेवा ही प्रभू सेवा या पू. डोंगरे महाराज यांनी दिलेल्या सुत्रांच्या प्रेरणेने होत आहे. यासाठी रामकृष्ण सेवा संस्थेचे संचालक जसुभाई चंदाराणा, विनुभाई तन्ना मेहनत घेत आहेत. याकामी छबिलदास कारीया, तुषार दानी, मितुल देसाई, वन्सभाई चंदाराणा, सुभाष रायचूरा, राजीव चंदाराणा, विष्णूकुमार चौधरी, प्रेयाक रायचुरा, रश्मी चंदाराणा, भुषण कारीया, मोनीश चंदाराणा, दिपक कारीया, अतुल तन्ना आदी सहभागी झाले. यावेळी सेवा संस्थेचे कर्मचारी व दाता परिवार यांचे आभार संस्था संचालक जसुभाई चंदाराणा यांनी मानले.

## भिवंडीतील मुस्लिम समाजास शहराबाहेरील उमेदवाराची प्रतीक्षा



**भिवंडी :** शहरात बहुसंख्येने मुस्लिम समाजाचे मतदार असून शहरात होणाऱ्या विविध निवडणुकीत या मतदारांचा वरचष्मा असल्याने विविध राजकीय पक्ष स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यापेक्षा आयात उमेदवारांना प्राधान्य देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा शहरात सुरु आहे.

शहरात भिवंडी पूर्व आणि भिवंडी पश्चिम या दोन मतदारसंघातून डझनभर उमेदवारांची नावे सोशल मीडियावर फिरत असून स्थानिक उमेदवार देखील कोणत्या पक्षातून लढणार याची देखील निश्चिती न झाल्याने शहरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. या चर्चेमुळे स्थानिक मुस्लिम उमेदवारांवर नागरिकांचा विश्वास नसल्याचे अधिक स्पष्ट होऊ लागले आहे.

सन 2019 च्या विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाने भिवंडी पूर्व मतदारसंघात मुंबईचे नगरसेवक रईस शेख यांना उभे केले होते. त्यांना स्थानिकांसह नव्याने भिवंडीत राहण्यास आलेल्या मुस्लिम रहिवाश्यांनी भरभरून मते दिली. त्यामुळे त्यांचा विजय झाला. त्यांच्या कार्यकाळात भिवंडी पश्चिम भागात नागरिकांच्या सोयीने मोठी कामे झाली. त्यामुळे समाजवादी पक्षासाठी सुरक्षित झाल्याने सपा आमदार अबू असीम आझमी यांनी त्यांच्या मुलाला निवडणुकीसाठी उभे करण्याचे मनसुबे रचून रईस शेख यांना भिवंडी पश्चिममध्ये उमेदवारी देण्याचा घाट घातला. त्यामुळे स्थानिक समाजवादी पक्षात दुही माजली. आघाडीमध्ये राष्ट्रवादी पक्षाने भिवंडीतील दोन्ही जागेवर दावा केल्याने आमदार रईस शेख हे राष्ट्रवादीच्या गटातून निवडणूक लढवणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तर काही दिवसांपूर्वी समाज माध्यमातून मुंबईतील एमआयएमचे माजी आमदार वारीस पठाण यांनी देखील पक्षाने सांगितले तर भिवंडी पश्चिम मधून निवडणूक लढवण्याची इच्छा प्रगट केली. राजकीय पक्षांच्या या मनसुब्यामुळे भिवंडीत समाजवादीला शह मिळणार असल्याची चर्चा शहरात सुरु झाली आहे.

दरम्यान भिवंडीच्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने समाजवादी पक्ष आणि एमआयएम या दोन्हीची दखल घेतली नाही तर महाविकास आघाडीच्या उमेदवारास फटका बसू शकतो. भिवंडीत दोन वेळा समाजवादी पक्षाचे आमदार निवडून आले होते. तर मागील निवडणुकीत एमआयएमच्या उमेदवाराने भाजप उमेदवारास चांगलीच टक्कर देऊन दुसऱ्या क्रमांकाची मते घेतली होती. त्यामुळे भिवंडीत पक्षाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मात्र भिवंडीतील मुस्लिम समाजात स्थानिक उमेदवारांपेक्षा बाहेरील उमेदवारास पसंती असल्याचे ठिकठिकाणी बोलले जात आहे.



संतोष नाईक यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना महेंद्र पालेकर, सुनिल अशीनकर, अभिषेक पालेकर आणि इतर.

## बालक मंदिर संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन




**कल्याण :** बालक मंदिर संस्था प्राथमिक शाळा 1966 मध्ये स्थापन झाली असून शाळेला 58 वर्ष पूर्ण झाली आहेत. शाळेची इमारत जुनी झाल्याने जुनी इमारत पाडून या ठिकाणी शाळेची नवीन वास्तू उभी रहावी हे स्वप्न बालक मंदिर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पाहिले होते.

संस्था पदाधिकाऱ्यांच्या अथक प्रयत्नामुळे तसेच बालक मंदिर संस्थेचे माजी विद्यार्थी, पालक व सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे शाळेची अत्याधुनिक व विविध सुखसोयींनी सुसज्ज अशी नवीन इमारत उभी राहिली आहे. या नवीन इमारतीचे उद्घाटन नुकतेच झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन इंडियन सेंटर फॉर कल्चरल रिलेशन्स, नवी दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी शाळेच्या स्थापनेपासून ते आजतागायत झालेल्या उल्लेखनीय उपक्रमांची चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली.

यंदाचे वर्ष हे संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने संस्थेच्या स्मरणिका प्रकाशनाचा सोहळाही आयोजित करण्यात आला होता. बालक मंदिर संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी व सर्व पालक वर्ग हितचिंतक यांच्या सहकार्यामुळे संस्थेच्या प्राथमिक शाळेची नवीन अत्याधुनिक वास्तू उभी राहिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅप्टन रवींद्र माधव, ओक हायस्कूलच्या शिक्षिका पाठक व बालक मंदिर संस्था प्राथमिक शाळेच्या शिक्षिका प्रतिभा मोरे यांनी केले. ईशस्तवन व स्वागतगीत कामिनी पाटील यांनी सादर केले.

## पहिल्या उपांत्य फेरीत भिडणार ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज



जुईली बल्लाळ
क्रीडा विश्लेषक, ठाणेवैभव

दुबईत मंगळवारी इंग्लंडवर दणदणीत विजय मिळवल्यानंतर, वेस्ट इंडिजने या आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या नवव्या आवृत्तीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्याच मैदानावर आता २०१६ चा विजेता संघ वेस्ट इंडिज गुरुवारी गतविजेत्या ऑस्ट्रेलिया बरोबर भिडणार आहे. जो संघ विजेता होईल तो या विश्वचषकाचा अंतिम सामना रविवारी खेळेल. साखळी फेरीत वेस्ट इंडिजचा एक पराभव (दक्षिण आफ्रिकेविरुद्ध) झाला होता, तर ऑस्ट्रेलिया त्यांच्या चारही साखळी सामन्यात अपराजित राहिले आहेत.

**आमने-सामने**

ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांनी एकमेकांविरुद्ध १६ आंतरराष्ट्रीय टी-२० सामने खेळले आहेत. त्यापैकी ऑस्ट्रेलियाने १४ तर वेस्ट इंडिजने केवळ दोन सामने जिंकले आहेत. टी-२० विश्वचषकात त्यांनी सहा सामने खेळले असून ऑस्ट्रेलिया ५-१ ने आघाडीवर आहे.

**संघ**

**ऑस्ट्रेलिया:** ॲलिसा हिली (कर्णधार), डार्सी ब्राउन, ॲशले गार्डनर, किम गार्थ, ग्रेस हॅरिस, अलाना किंग, फीबी लिचफिल्ड, ताहलिया मॅकग्रा, सोफी मोलिनी, बेथ मूनी, एलिस पेरी, मेगन शुट, ॲनाबेल सदरलँड, टायला व्लामिंक, जॉर्जिया वेअरहॅम

**वेस्ट इंडिज:** हेली मॅथ्यूज (कर्णधार), आलिया ॲलेन, शमिलिया कोनेल, डिआंड्रा डॉटिन, शीमेन कॅम्पबेल, अश्मिनी मुनिसार, ॲफी फ्लेचर, स्टॅफनी टेलर, शिनेल हेन्री, चेडियन नेशन, कियाना जोसेफ, झैदा जेम्स, करिश्मा रामहारक, मँडी मंगरु, नेरिसा क्राफ्टन.

**कुठल्या खेळाडूंवर लक्ष ठेवायचे**

**बेथ मूनी:** ऑस्ट्रेलियाच्या या डावखुऱ्या सलामीच्या फलंदाजाकडून तिच्या संघाला चांगली सुरुवात करून देण्याची अपेक्षा असेल. या विश्वचषकाच्या पहिल्या दोन सामन्यांमध्ये तिने ४०+ धावसंख्या केली होती. परंतु त्यानंतरच्या दोन चकमकीत ती मोठी खेळी खेळू शकली नाही. या उपांत्य फेरीत ती आपली सर्वोत्तम कामगिरी करण्याचा निर्धार ठेवेल.

**मेगन शुट:** ऑस्ट्रेलियाच्या या उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाने या विश्वचषकात आतापर्यंत तिच्या चार साखळी सामन्यांमध्ये किमान एक विकेट पटकावली आहे. तिने एकूण आठ विकेट्स घेतल्या आहेत. नवीन चेंडूने ती उत्कृष्ट गोलंदाजी करते.

**कियाना जोसेफ:** वेस्ट इंडिजच्या या डावखुऱ्या सलामीच्या फलंदाजाने तिच्या मागील सामन्यात इंग्लंडविरुद्ध शानदार अर्धशतक झळकावले. तिच्या त्या मनोरंजक खेळीत सहा चौकारांचा आणि दोन षटकारांचा समावेश होता. तिने तिची सलामीची जोडीदार आणि कर्णधार हेली मॅथ्यूजसोबत १०२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारीही केली.

**ॲफी फ्लेचर:** वेस्ट इंडिजच्या या उजव्या हाताच्या लेगस्पिनरने या विश्वचषकात आतापर्यंत चार सामन्यात आठ विकेट्स घेतल्या आहेत. तिने सातत्याने चांगल्या टप्प्यावर गोलंदाजी केली आहे. नियमित अंतराने तिने विकेट्स घेत तिच्या संघासाठी उपयुक्त योगदान दिले आहे.

**हवामान:** सुमारे ३१ अंश सेल्सिअस तापमान आणि ६१ टक्के आर्द्रता असलेले हवामान उबदार आणि दमट राहण्याची अपेक्षा आहे. २२ किमी प्रतितास वेगाने वारे वाहतील, ज्यामुळे वातावरण थोडे हवेशीर असू शकते.

**सामन्याची थोडक्यात माहिती : तारीख: १७ ऑक्टोबर २०२४ | वेळ: संध्याकाळी ७:३० वाजता**
**स्थळ: दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम | प्रसारण: स्टार स्पोर्ट्स नेटवर्क, डिस्नी + हॉटस्टार**

# क्षमता – एक सामाजिक आधारवड!

**क्षमता या सामाजिक संस्थेची स्थापना 2011 साली झाली. ठाणे शहरातून सुरु झालेली ही संस्था आज एका व्यापक सामाजिक उद्दिष्टासाठी कार्यरत आहे. मानवी तस्करी आणि शोषणाच्या विळख्यात अडकलेल्या महिला, किशोरवयीन मुली यांचे पुनर्वसन आणि आर्थिक स्वावलंबनासाठी सक्षम करणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. संस्थेने आतापर्यंत शेकडो महिलांना त्यांच्या आयुष्याला नवी दिशा देण्यास मदत केली आहे.**








रुहानी- स्वतंत्र विचारांची, सन्मानाचं जीवन जगणारी, इतर महिलांना सुद्धा आर्थिकदृष्ट्या स्वतंत्रपणे पायावर उभं राहायला सक्षम करणारी. अवघ्या 24 वर्षांची ही युवती आज एक यशस्वी उद्योजिका म्हणून अभिमानाने जीवन जगत आहे. कमी वयातच तिने मिळवलेलं यश पाहून अचंबित होऊन प्रशंसा करतात, आश्चर्य व्यक्त करतात, त्यातून कोणाकडून कौतुकाची थाप पडलीच तर मात्र रुहानी तिचा जीवनप्रवास आठवून आपोआपच धीर-गंभीर होते. क्षणासाठी काळजाचा ठोका चुकवणारे अनेक प्रसंग तिच्या डोळ्यासमोर उभे राहतात आणि लगेचच तिच्या डोळ्यात पाणी तरळतं.

ज्या वयात शाळेत जायला हवं त्याच कोवळ्या वयात तिचं स्वतःच्याच कुटुंबात लैंगिक शोषण झालं. विकृत मानसिकतेला आळा घालण्याऐवजी तिलाच दोष देत पालकांकडून मारहाण झाली, कोणीतरी मला समजून घेईल म्हणून घरातून पळून गेलेल्या रुहानीला मदत तर दूरच पण, एका महिलेने पैशांसाठी तिची विक्री केली, विश्वासावरच मोठा आघात झाल्यानं रुहानीची मानसिक स्थिती कमालीची ढासळली. तरीही तिने मोठ्या हिमतीने स्वतःची सुटका करुन घेत पोलिसांची मदत घेतली. त्यानंतर शासकीय बालगृहात काढलेले दिवस आणि क्षमता संस्थेमध्ये झालेली तिची जडणघडण हा सगळाच प्रवास रुहानीसाठी खुप खडतर होताच, परंतु अनेक संकटांना पुरे पडून आज रुहानीने यशाचे शिखर गाठले आहे. क्षमताने अशा अनेक रुहानी घडवल्या आहेत ज्यांची कहाणी ऐकून अभिमान वाटतोच पण, त्याहून त्यांचा संघर्ष बघून आणखीनच थक्क व्हायला होतं.

क्षमता ट्रान्सफॉर्मेशन सेंटर (KTC), शासकीय महिला वसतिगृह आणि बालगृहातील महिलांसाठी पुनर्वसन उपक्रम, क्षमता अनलिमिटेड (उद्योग आणि रोजगार) आणि देहविक्री व्यवसाय करणाऱ्या महिलांचे सक्षमीकरण अशा चार प्रमुख स्तरांवर क्षमता काम करीत आहे. या सर्व उपक्रमांचा एकच उद्देश - महिलांना सन्मानाने जगण्यासाठी, स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी आणि समाजात स्वतःचं स्थान निर्माण करण्यासाठी सक्षम करणे.

क्षमता ट्रान्सफॉर्मेशन सेंटर हे क्षमताचे निवासी केंद्र आहे, जिथे महिलांना आणि मुलींना व्यावसायिक कौशल्यांचे सखोल शिक्षण दिले जाते. याचबरोबर त्यांना जीवन कौशल्यांचंही प्रशिक्षण दिलं जातं, जेणेकरुन त्या समाजात एक व्यक्ती म्हणून स्वतंत्रपणे वावरु शकतील. सेंटरमध्ये सध्या 35 किशोरवयीन मुली राहत असून वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून नव्या जीवनाच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरु आहे.

या मुलींना शिवणकाम, हस्तकला, ब्युटिशियन कोर्स, कॅटरिंग, इंग्रजी भाषाशिक्षण, संगणक कौशल्ये, आर्थिक साक्षरता यांसारखे प्रशिक्षण दिले जाते. मुली आपापल्या आवडीप्रमाणे विविध कौशल्य शिकतात आणि त्यातच करिअर करुन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतात. आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यानंतर स्वतंत्रपणे समाजात राहता यावं याची सुद्धा एक स्वतंत्र अशी सोय क्षमताने केलेली आहे. गट निवास युनिट्स (GSUs) च्या अनोख्या मॉडेलद्वारे क्षमता त्यांना स्वतंत्रपणे राहायला शिकवते, जे अत्यंत यशस्वी ठरले असून, यामुळेच महिलांना सहजपणे समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी मदत होत आहे.

### शासकीय महिला वसतिगृह आणि बालगृहांमधील पुनर्वसन –

शासकीय आश्रयगृहांमधील महिलांबरोबर काम करणं हे आव्हानात्मक आहे. विविध कारणांमुळे महिला, मुली इथे आलेल्या असतात. अशावेळी त्यांना मानसिक, भावनिक आणि सामाजिकदृष्ट्या सावरणं हे महत्त्वाचं असतं म्हणून क्षमता टीमकडून यांचे वारंवार समुपदेशन केले जाते. त्यांना उपजीविकेच्या पर्यायांची माहिती दिली जाते आणि त्यांना त्यांचं अस्तित्व सापडावं यासाठी मुख्यतः काम केलं जातं. त्यासाठी साक्षरता, जीवन कौशल्य, संगणक साक्षरता अशा अनेक वेगवेगळ्या उपक्रमांतून त्यांना व्यस्थ ठेवले जाते. उपक्रमात वारंवार सहभाग घेतल्याने महिलांमधील आत्मविश्वास वाढतो. शिवणकला, ज्वेलरी बनवणे यासारख्या उपक्रमात गुंतून राहिल्यामुळे त्यांना त्यांच्यातील क्षमतेची जाणीव होते आणि पुढे काय करायचं हे आपसूकच त्या ठरवू लागतात.

वसतीगृहातील महिलांच्या मुक्कामाचा कालावधी अनिश्चित असतो, त्यांच्या प्रकरणांचे निकाल लागल्यावर त्यांचा तिथे राहण्याचा कालावधी ठरतो. कालावधी कितीही असला तरीही या महिला, सुटकेनंतरही पुरेशी व्यावसायिक कौशल्ये, ज्ञान आणि अनुभवाच्या अभावामुळे असुरक्षित राहण्याची शक्यता असते. पैशांची गरज पुन्हा त्यांना तेच जाळं खुणावू लागते, परिणामी संघर्ष, कायम असुरक्षिततेचे जीवन त्या जगू लागतात. परिस्थिती अभावी अनेक महिला देहविक्री व्यवसायात किंवा इतर शोषणात्मक परिस्थितीत परततात.

या महिला पुन्हा त्या मार्गावर जाऊ नये म्हणून मुंबई आणि ठाण्यातील विविध वसतीगृहातून सुटलेल्या महिलांच्या एका गटासोबत क्षमताने पायलट-आधारित प्रकल्पामध्ये यशस्वीपणे हे प्रयत्न केले (2021-2022), याला मिळणारा महिलांचा चांगला प्रतिसाद पाहून आणखी मोठ्या प्रमाणावर संस्थेने प्रयत्न सुरु केले आणि सध्या 'सुपर 50' प्रकल्पाच्या माध्यातून हे काम सुरु आहे.

**संकलन - डॉ. खुशबू टावरी**

### क्षमता अनलिमिटेड –

क्षमता अनलिमिटेड हा उपक्रम म्हणजे महिलांना, किशोरवयीन मुलींना नोकरी मिळवण्याच्या आधीचा संरक्षित रोजगाराचा अनुभव देणारा उपक्रम आहे. यामध्ये त्यांना नोकरीसाठी आवश्यक असलेलं ज्ञान, कौशल्य आणि अनुभव मिळतो. महिला येथे प्रशिक्षण घेतात, त्याचवेळेला त्यांना कमवण्याची संधीही मिळते. हस्तकला, शिवणकाम, कॅटरिंग, दागिन्यांचं उत्पादन यासारखे उद्योग या उपक्रमांतर्गत चालवले जातात. महिलांना कामाच्या शिस्तीचं महत्त्व, वेळेचं पालन आणि जबाबदारी शिकवण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यांना काम करता करता भविष्याचे नियोजन करता येते आणि त्याचवेळी त्यांचं पुनर्वसनही होतं.

क्षमताचा सगळ्यात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे देहविक्री व्यवसाय करणाऱ्या महिलांचे सक्षमीकरण. वर्षानुवर्षे महिला कुटुंबापासून लांब राहून पैसे कमावण्यासाठी देहविक्रीचा व्यवसाय करतात. मात्र, हा व्यवसाय जेव्हा कालांतराने कमी होतो, त्यावेळी या महिलांची वाताहत होते. बऱ्याचदा या व्यवसायात जबरदस्तीने ओढल्या गेलेल्या महिला बाहेर पडण्यास उत्सुक असतात, मात्र त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग न मिळाल्याने त्या पुन्हा अडकतात, अशा सगळ्या महिलांच्या सक्षमीकरणाचे काम क्षमता करते. त्यांचे समुदेशन करुन त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मदत केली जाते.



'उत्कर्ष मायक्रो बिझनेस' या उपक्रमाच्या अंतर्गत आतापर्यंत 150 हून अधिक देहविक्री करणाऱ्या महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरु केला आहे. काहींनी देहविक्री सोडून, त्या व्यवसायातून बाहेर पडून स्थलांतर केले आहे आणि नव्या व्यवसायाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनाचा नवीन अध्याय सुरु केला आहे. क्षमताच्या या प्रयत्नांमुळे अनेक महिलांना एक नवसंजीवनी मिळाली आहे, ज्यामुळे त्यांचे जीवन अधिक सन्मानाचे, सुरक्षित आणि स्वतंत्र झाले आहे.

अनेकजण सामाजिक संस्था म्हटलं की नको रे बाबा... म्हणत लगेचच पळ काढतात, तर काहीजण स्वतःहून पुढे येत त्याबाबत चौकशी करतात. जिथे अनेकांचे काम संपते तिथे क्षमताचे काम सुरु होते, त्यामुळे संस्थेच्या कामाचा पसारा मोठा आहे, म्हणून या कामात आपल्या सगळ्यांच्याच सहभागाची गरज आहे. केवळ पैशांनी मदत करता येते असे नाही, तुम्ही तुमचा अमुल्य वेळ देऊन सेंटरमध्ये उपक्रम घेऊ शकता, नवनवीन गोष्टी शिकवू शकता आणि हे सामाजिक कार्य मोठं करण्यास हातभार लावू शकता. महिलांना स्वतंत्रपणे उंच भरारी घेण्यासाठी, त्यांना अधिक सक्षम करण्यासाठी क्षमताच्या या प्रवासात तुम्हाला सामील व्हायला आवडेल का?

**संस्थेच्या कामाबाबत अधिक माहितीसाठी आणि मदतीसाठी सुचित्रा पेडणेकर 7219145186 यांच्याशी संपर्क साधावा.**

# महागिरी येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर







**ठाणे :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष वैद्यकीय मदत कक्षातर्फे महागिरी येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला.

भारतीय जनता पार्टीचे ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष जयेंद्र कोळी व माजी नगरसेविका नम्रता कोळी यांच्या माध्यमातून या शिबिराचे आयोजन ठाण्यातील अंजुमन हायस्कूल, महागिरी येथे करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, भाजपाचे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव संदीप लेले, वैद्यकीय मदत कक्षाचे डॉक्टर राहुल कुलकर्णी यांच्या उपस्थित करण्यात आले. या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांकडून मोफत कान नाक, घसा तपासणी, रक्त व लघवी तपासणी, हाडांच्या रोगांची चिकित्सा, त्वचा रोग तपासणी, मोफत स्त्री रोग चिकित्सा, मोफत बालरोग चिकित्सा, मोफत रक्त तपासणी मधून एकूण 57 प्रकारच्या विशेष रोगांची चिकित्सा, मलेरिया, थायरॉईड, कॅन्सर, मार्कर टेस्ट, आदी विविध प्रकारच्या तपासण्या या ठिकाणी मोफत करण्यात आल्या. यामध्ये आवश्यक पडल्यास रुग्णाची शस्त्रक्रिया देखील मोफत करण्यात येणार आहे.



# आगरी समाजासाठी स्वतंत्र महामंडळ; आगरी सेनेला यश

**ठाणे :** आगरी समाजाच्या उन्नतीसाठी 1 ऑगस्ट आगरी सेना वर्धापन दिनानिमित्त आगरी सेना प्रमुख राजाराम साळवी यांनी सरकारकडे आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करावे मागणी केली होती. आमदार विश्वनाथ भोईर यांनी विधानसभेमध्ये ही मागणी लावून धरली. याबाबत केलेल्या पाठपुराव्यानंतर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वतंत्र आगरी समाज महामंडळ निर्मितीचा शासन निर्णय झाला आहे.

या निर्णयामुळे 15 ऑक्टोबर रोजी कळवा येथील आगरी सेना मुख्यालयात सकाळी 11 वाजता आगरी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी फटाके फोडून व एकमेकांना पेढे भरवून जल्लोष व आनंद व्यक्त केला. यावेळी आगरी सेनाप्रमुख राजाराम साळवी यांनी महायुती सरकारचे आभार मानले.

या प्रसंगी आगरी सेना प्रमुखांसोबत सरचिटणीस मेघनाथ पाटील, कामगार एकताचे कार्याध्यक्ष प्रदीप साळवी तसेच मनोज साळवी, चंद्रकांत ठाणकर, नारायण अंदाडे, मंगेश शेलार, संजय फुलोरे, संपत डावखर, फुलाजी पाटील, महेश भगत, शत्रुघ्न भोईर, कृष्णा परटोले, शनी आंभोरे, अनिल भोपे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# गायन-वादन नृत्याचा त्रिवेणी संगम




**ठाणे :** ठाण्यातील श्री गणेश कल्चरल अकॅडमीतर्फे आयोजित पद्मश्री नटराज गोपीकृष्ण महोत्सव नुकताच काशिनाथ घाणेकर ठाणे येथे रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीत झाला.

गायन, वादन आणि नृत्य असा त्रिवेणी संगम साधणाऱ्या महोत्सवाचे यंदाचे 30 वे वर्ष होते. दोन दिवस रंगलेला हा महोत्सव रसिकांसाठी गायन वादन नृत्याची सुरेल मेजवानी ठरला. दोन दिवस रंगलेल्या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. रवींद्र प्रभुदेसाई, सुधीर निरगुडकर,पराग गद्रे,केदार जोशी, डॉ मंजिरी देव, स्मिता शहा आणि इतर मान्यवर कलाकार उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर पहिल्या दिवशी डॉ. संगीता शंकर, रागिणी शंकर, नंदिनी शंकर यांच्या व्हायोलिन वादनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. त्यांनी श्याम कल्याणमधील रचना व नाट्यपद सादर करून व्हायोलिन वादनातील लयकारीवर असलेले प्रभुत्व उलगडून दाखवले. त्यांना पं. मुकुंदराज देव यांनी तबला साथ केली. रुद्र शंकर मिश्रा यांनी कथक नृत्य सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना तबल्यावर रोहित देव, संवादिनी व गायन श्रीरंग टेंबे यांनी साथसंगत केली.

शनिवारच्या दुसऱ्या सत्रात गुणी युवा कथक नर्तिका प्रियांका शिंदे, प्रिया देव व तेजश्री मुळे यांनी आपल्या कथक अविष्कारातून शिवधृपद ताल रूपक व दादरा सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना तबल्यावर रोहित देव, अवधूत घेवडेकर, पं. मुकुंदराज देव तसेच संवादिनी मिहिर टाकसाळे, बासरी गंधार भालेराव गायन प्राजक्ता जोशी इत्यादी कलाकारांनी साथ संगत करून आपल्या सादरीकरणातून संगीत व नृत्यमय वातावरण निर्माण केले.

यानंतर उस्ताद शाहीर परवेज यांचे शिष्य उ. शाकीर खान यांनी आपल्या सतार वादनातून राग झिंजोटीमध्ये ताल झपतालमधील गत व द्रुत तीन ताल व धून गायकी अंगाने पेश करून रसिकांना वेगळ्या शिखरावर नेले. त्यांना तबल्यावर रोहित देव यांनी साथ केली. त्यानंतर तालमणी मुकुंदराज देव व उस्ताद अक्रम खान यांनी अप्रतिम तबल्याची जुगलबंदी सादर करून रसिकांच्या टाळ्यांची थाप मिळवली. त्यांना संवादिनीवर सिद्धेश बीचोलकर आणि सारंगीवर संगीत मिश्रा यांनी अप्रतिम साथ संगत केली.

शेवटच्या सत्राची सांगता ग्वाल्हेर आग्रा परंपरेचे सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित उल्हास कशाळकर यांच्या सुरेल मैफीलीने झाली.प्रत्येक रागाच्या बंदिशीच्या अनुषंगाने त्यांच्या गायकीतून येणारी सुमधुर आलाप तानांची बढत व बंदीशीप्रमाणे येणारे स्पष्ट उच्चार इत्यादी वैशिष्ट्य आपल्या गायकीतून उलगडून राग जोगकौंस आणि सोहोनी सादर केले. त्यांना तबला पं मुकुंदराज देव व संवादिनी अनंत जोशी यांनी उत्तम साथसंगत केली. भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.






**जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेना सहसचिव विधानसभा क्षेत्रपदी आनंद दिघे यांची नियुक्ती झाली. त्यांना नियुक्तीपत्र देताना जेरी डेव्हिड. या नियुक्तीबद्दल श्री.दिघे यांचे जय संतोषी माता मित्र मंडळ, जय माता दी ग्रुपच्या सदस्यांनी अभिनंदन केले.**


# आमचे नेत्रालय

श्रीरामकृष्ण नेत्रालयमध्ये नेत्र तपासणीसाठी गेलो होतो. तपासणीमध्ये दोन्ही डोळ्यांत मोतीबिंदू असल्याचे समजले. त्याप्रमाणे उपचार सुरु करून शस्त्रक्रिया करण्याचे ठरविले. शस्त्रक्रिया उत्तम प्रकारे पार पडली. येथील व्यवस्थापन खूप चांगले आणि चौकस आहे. डॉक्टर चांगले आणि अनुभवी आहेत, अतिशय आनंदी स्वभावाचे आहेत. सर्व कर्मचारी देखील खूप सहकार्य करत होते. ऑपरेशनसाठीची प्रक्रिया अतिशय आरामदायक आणि सुरळीत केली. नोंदणीपासून शस्त्रक्रियेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया चार तासांपेक्षा कमी कालावधीत पार पडली. डॉक्टरांसोबतच आमच्या संपर्कात आलेला प्रत्येक कर्मचारी हा विनम्र आणि आदराने वागणारा होता आणि वैयक्तिकरित्या हजर होता. येथील स्वच्छता आणि व्यावसायिक कौशल्यांनी भरलेले हे रुग्णालय सर्वोत्तम आहे. डोळ्यांशी संबंधित कोणत्याही समस्यांसाठी मी श्रीरामकृष्ण नेत्रालयला शिफारस करतो, चंद्रशेखर लेले सांगतात.



चंद्रशेखर लेले

Shree Ramkrishna Netralaya
Super Speciality Eye Care

**श्री रामकृष्ण नेत्रालय :** घोडबंदर रोड | मखमली तलाव | मुलुंड | वाशी | सी वूड्स
चेंबूर : २०१/२०२, एल्मर, प्लॉट नं. ५६३, सेंट्रल अवेन्यू, रोड नं.११, चेंबूर
संपर्क - ७५०६०६६७६९ | ई-मेल: info@shreeramkrishnanetralaya.com,
https://www.shreeramkrishnanetralaya.com/

